सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.com

जानेवारी ते मार्च २०२३

# क्षणचित्रे




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांचे स्वागत करतांना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार यांचे स्वागत करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळेचे प्रास्ताविक सादर करतांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| संपादकीय मंडळ | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष ३ रे। अंक ११ वा। जानेवारी ते मार्च २०२३

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - अमृत महा आवास अभियान उद्दिष्टपूर्ती | ३ |
| ३ | अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत मान्यवरांचे पत्र | ७ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ९ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १८ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

महा आवास त्रैमासिकाच्या माध्यमातून आपणासोबत संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. प्रत्येक तीन महिन्यात या माध्यमातून संवाद साधत असतो जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीमध्ये राज्याच्या विविध स्तरावर घडत असलेल्या घडामोडींचा धांडोळा घेण्याबरोबरच केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांविषयीचाही उहापोह या निमित्ताने करणे आवश्यक वाटते.

ग्रामीण आवास योजना केंद्र व राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्यामुळे याच्या मध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी अनेकविध प्रयत्न केंद्र व राज्य पातळीवर होताना दिसत आहेत. तसेच राज्यामध्ये राबविण्यात येत असलेले अमृत महा आवास अभियानची प्रगतीही यानिमित्ताने आपणासोबत चर्चा करत आहे. मागील दोन अभियानाच्या पार्श्वभूमिवर या अभिनामध्ये अनेक नाविन्यपुर्ण उपक्रम हाती घेतले असून याला प्रतिसादही मोठया प्रमाणावर मिळताना दिसत आहे.

महाराष्ट्रामध्ये आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून आपण प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत १० लाखापेक्षा अधिक घरकुले पुर्ण केली आहेत. तर राज्य पुरस्कृत आवास योजने अंतर्गत ४ लाखापेक्षा अधिक घकुले पुर्ण केली आहेत. असे असले तरी अद्याप केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांतील मंजूरी दिलेली ५ लाखापेक्षा अधिक घरकुले अपुर्ण आहेत.

दरम्यानच्या काळामध्ये आपण घरकुले पुर्ण करणे व घरकुलांना मंजूरी देण्यासाठी मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विभागनिहाय मोहिमांचे आयोजन केले होते. या मोहिमांच्या माध्यमातून राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सहाय्याने गतिमान पद्धतीने घरकुले पुर्ण केले आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यात १ लाखापेक्षा अधिक घरे तर राज्यपुरस्कृत योजनांतून ३० हजारपेक्षा अधिक घरे ९० दिवसांमध्ये पुर्ण करण्यात आली आहेत. याबद्दल आपल्या सर्वांचे अभिनंदन यामुळे देशाच्या पातळीवर आपला नेहमी पहिला क्रमांक राहिला आहे. प्रगतीचा हा आलेख आपणास ऑगस्ट २०२३ पर्यंत असाच चालू ठेवायचा असून उर्वरीत सर्व घरकुले आपण १५ ऑगस्ट २०२३ पुर्वी पुर्ण करण्याच्या सुचना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून देण्यात आलेल्या आहेत. याचे सुक्ष्म नियोजन करून ती पुर्ण करण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे.

अमृत महा आवास अभियानच्या विविध उपक्रमांचा धांडोळा घेतला असता ७३ हजार पेक्षा अधिक लाभार्थ्यांना आपण आज अखेर

जागा उपलब्ध करून दिली असून अद्याप ५४,७९३ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. मागिल तीन महिन्यामध्ये हप्ते वितरणात आपली प्रगती चांगली राहिली आहे. तसेच घरकुल मार्ट, सँड बँक, प्रलंबीत घरकुले पुर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पुर्ण करणे व त्यांचे मुल्यांकन करणे, सामाजिक लेखापरिक्षण करणे, इंदिरा आवास योजनेतील अपुर्ण घरकुले पुर्ण करणे, शासकीय योजनांशी कृती संगम करणे, नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे यातही आपली प्रगती उल्लेखनिय आहे. असे असले तरी या सर्व बाबींमध्ये जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील अधिकारी/कर्मचारी तसेच लाभार्थ्यांचा सक्रिय सहभाग महत्वाचा आहे.

अमृत महा आवास अभियानाला अधिक गतिमान करण्यासाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तसेच मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मा. अतिरीक्त मुख्य सचिव, महसूल व वन विभाग व मा. अतिरीक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांची अनुक्रमे सरपंच, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना दिलेल्या पत्रांमुळे अभियानाला गतिमानता प्राप्त झाली असून त्यांच्या स्तरावर अभियानाचा आढावा घेण्यात येत आहे. याचा सविस्तर अहवाल सदर अंकामध्ये देण्यात आला आहे.

तसेच राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तराव घेण्यात आलेल्या विविध आढावा बैठका, कार्यशाळा, क्षेत्रीय भेटी यामध्ये राज्यातील अधिकारी यांच्या भेटी बरोबरच ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार येथील अधिकाऱ्यांच्या भेटीचे वृत्तांकण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या नाविन्यपुर्ण उपक्रमांबाबतची माहितीही या अंकात देण्यात आली आहे.

शासकीय यंत्रणेच्या सहकार्यामुळे ग्रामपंचायत चिखली, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर येथील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचे लाभार्थी श्री.राजेंद्र डोमाजी पिंपळकर यांच्या मृत्यु नंतर त्यांच्या वारसाला दिलेला घरकुलाचा लाभ, ग्रामपंचायत पुसला, तालुका वरूड, जिल्हा अमरावती येथील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या लाभार्थी श्रीमती सावित्री देवीदास बोरीवर यांना महा आवास अभियानामुळे मिळालेला सुरक्षित निवारा, ग्रामपंचायत चिंचाळा (उ.प.), तालुका उमरी, जिल्हा नांदेड येथील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचे लाभार्थी श्री. बालाजी जळबा कोरनेलू यांना हक्काच्या पक्क्या घरकुलासह शासकीय योजनांच्या कृती संगमातून मिळालेले लाभ, ग्रामपंचायत चेडेचांदगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर येथील घरकुल लाभार्थी श्री. मनोहर तुकाराम चेडे यांनी २१ दिवसांच्या विक्रमी कालावधीत बांधलेले घरकुल, ग्रामपंचायत तळे हिप्परगा, तालुका व जिल्हा सोलापूर येथील रमाई आवास योजनेच्या दिव्यांग लाभार्थ्यासाठी त्याच्या वडीलांनी अवघ्या ३५ दिवसात बांधलेले घरकुल व ग्रामपंचायत नारूर, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचे आवास योजनेमुळे कुडाच्या घराचे पक्क्या घरात झालेले रूपांतर, इ. विभागनिहाय यशोगाथांचा समावेश सदरच्या अंकामध्ये करण्यात आला आहे.

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

### भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त

# अमृत महा आवास अभियान २०२२-२३ उद्दिष्टपूर्ती

राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

"सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून "अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, ॲड. राहुल नार्वेकर, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांचे प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

या प्रसंगी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, महा आवास अभियान २०२०-२१ चे पुरस्कार विजेते, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व ग्राम विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी, इ. उपस्थित होते.

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची उद्दिष्टपूर्ती पुढील प्रमाणे आहे.




### -: i.भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे:-

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून ७३,०८७ भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता केली आहे. तसेच जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **६२० बहुमजली इमारती, ५८ गृहसंकुले व २ हाऊसिंग अपार्टमेंट**, इ. ची उभारणी केली आहे.

त्याचप्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची ८९९ 'लॅण्ड बँक'** तयार केली आहे.



### -: ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे :-

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १,१६,५१३ व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत ४१,२७१ अशा एकुण १,५७,७८४ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे. ग्रामीण गृहनिर्माण कामात लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरीत वितरीत करणे, घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे**, इ. उपक्रम राबविण्यात आले.



### -: iii. मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे :-

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत **१,२६,२३१ मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण कमीत कमी वेळेत** करून सर्व पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत करण्यात आले. हे करतांना लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजित केले**. तसेच गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून **गृहकर्ज मिळवून देण्यासाठी मदत** करण्यात आली.

### -: iv. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे :-

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्याकरीता लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी त्यांच्या बैठका/ मेळावे घेतले, सरपंच, ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी दिल्या. त्याचप्रमाणे मंजूर केलेली सर्व घरकुले किमान कालावधीत पूर्ण करण्यासाठी राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **२१६ घरकुल मार्ट** सुरु करुन त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध केले. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **४२५ 'सॅण्ड बँक'** ची निर्मिती केली.



अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १,३०,०६५ व सर्व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत ३९,८०८ अशी एकुण १,६९,८७३ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जवळ जवळ ३,३०,१२७ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून येत्या कालावधीत ही घरकुले पूर्ण होतील.



### -: v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे :-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून २४,४४३ घरकुले पूर्ण करण्यात आली**. याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **'लोक अदालत'** वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त केले. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand केली. तसेच यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.




### -: vi. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे :-

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २१,६७१ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंड्यांची निर्मिती करण्यात आली. **तसेच १५,१५५ गवंड्यांचे मुल्यांकन(Assessment) त्वरीत पूर्ण करुन** सदरची माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत केली. प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनवून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग** घेण्यात येत आहे.

कुशल गवंड्यांच्या पॅनल मुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली असून प्रशिक्षित गवंड्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.



## -: vii. इंदिरा आवास योजनेंतर्गत उर्वरीत सर्व घरकुले पूर्ण करणे व क्षेत्र अधिकारी ॲप वापरणे :-

इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या **२६,९४६ घरकुल लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरीत करून ९३७ घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण केली असून २६,००९ घरकुल लाभार्थ्यांना निधी वितरणाचे काम प्रगतीत आहे.** तसेच सन २०१५-१६ मध्ये १३,०७५ मंजूर घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून **त्यावर उपाययोजना करून १९८ घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण केली असून १२,८७७ घरकुलांचे काम प्रगतीत आहे.**

तसेच ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी **प्रधानंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer Aap) ची निर्मिती केली असून या ॲपचा वापर ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणीसाठी होत आहे.

## -: viii. सामाजिक लेखापरीक्षण वेळेत करणे :-

राज्यात ५९२ ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे **सामाजिक लेखापरीक्षण** करण्यात आले आहे. सामाजिक लेखापरीक्षण करतेवेळी लेखापरीक्षण मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला असून याकामी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, इतर पदाधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व पालक अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात आले.

## -: ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम करणे :-

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. यामध्ये **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून ५१,२४,०७५** मनुष्य दिवस रोजगार, **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून १,५४,८०३ शौचालये, जल जीवन मिशन मधून १,३७,६०८ घरांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री उज्ज्वला योजने मधून १,४६,६६३ गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून १,४७,९०१ विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून ४२,९३४ उपजिविकेचे साधन उपलब्ध, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मधून ८५,१९२ उर्जेच्या बचतीची साधनं**, इ. शासकीय योजनांचा लाभ कृती संगमातून घरकुल लाभार्थ्यांना देण्यात आला.



तसेच **दलित वस्ती सुधार योजने मधून ४०,४२८, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजने मधून २६,३२५, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस मधून ७४,४३० व सीएसआर निधी मधून २१,४२८** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे,** इ. उपलब्ध करुन देण्यात आल्यात.



## -: x. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे :-
## (Innovations / Best Practices)

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी अभियान कालावधीत पुढीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

अ) ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांच्या **बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट** यांच्या **३० सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.**

**ब) वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करून **६,३६३ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**

क) किमान १०% घरकुल बांधकामासाठी **स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान,** इ. चा वापर करून **५,१०८ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**

ड) किमान १०% घरकुल बांधकामामध्ये **फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, घरकुलांना रंगसंगती,** इ.चा वापर करून **१०,११६ घरकुलांची निर्मिती करण्यात आली.**

इ) घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबतची कार्यवाही ग्रामपंचायतस्तरावरून **८१,७०३ घरकुलांची करण्यात आली.**



## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणी कार्यक्रम

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यात अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजित करून या कार्यशाळांमध्ये अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे पुढील उपाययोजना करण्यात आल्या.



### -: ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन :-

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये ' ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात आले. यामध्ये गावातील सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस, प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश प्राधान्याने करण्यात आला. या गटाने **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न केले असून यापुढेही करणार आहेत.

### -: लाभार्थी मेळावे :-

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम व गृहप्रवेश कार्यक्रम, इ. सारखे उपक्रम राबविणेत आलेत.

### -: बँक मेळावे :-

तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आलेत.

तसेच या बँक मेळाव्यामंध्ये लाभार्थ्यांना गृह कर्ज व त्याकरीता आवश्यक कागद पत्रांबाबत मार्गदर्शन केले.



## जागतिक महिला दिनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व महिलांना सक्रीय सहभागी करण्यासाठी दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणाच्या हेतूने राज्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुले पूर्ण झालेल्या महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बचत गटात समाविष्ट नसलेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांचा स्वंयसहायत्ता बचत गटात समावेश करण्यात आला. ग्रामीण आवास योजने अंतर्गत ज्या महिला लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुल बांधकाम सुरू केले नाही, अशा महिला लाभार्थ्यांचा एकत्रित भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत इच्छुक महिलांचा समावेश करण्यात आला. तसेच गवंडी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. अभियानाच्या यशस्वीतेसाठी उत्सफूर्तपणे सहभाग घेतलेल्या महिला/ लाभार्थी/ कर्मचारी/ अधिकारी/ पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. महिला लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज मिळवून देण्यासाठी बँक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.

पंचायत समिती आवारामध्ये उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करण्यात आले. यासाठी स्वंयसहायत्ता महिला बचत गटांना प्राधान्यक्रम देण्यात आला. विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून महिला घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. सर्व महिला लाभार्थ्यांच्या नावांची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घेण्यात आली. त्याचप्रमाणे गावोगावी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत महिला मेळाव्यांचे आयोजन करून विविध आवास योजनांबाबत प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करण्यात आली. अशा प्रकारचे उपक्रम जागतिक महिला दिनी महिलांच्या सक्षमिकरणासाठी राबविण्यात आले.

जागतिक महिला दिनी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये महिला, महिला घरकुल लाभार्थी, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावरील सर्व अधिकारी/ कर्मचारी, पदाधिकारी व ग्रामस्थ, इ. सक्रीय सहभागी झाले. या उपक्रमांमुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गतिमानता व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती मिळण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.



# मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांचे सरपंच यांना अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग देणेबाबत पत्र

जा.क्र./मंत्री ग्रा.वि.व पं.राज/वै.शि/क्री.व युवक कल्याण/नोट/ ९३/२३

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**ग्रामविकास व पंचायत राज,**
**वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व**
**युवक कल्याण**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

**विषय -" अमृत महा आवास अभियान २०२२-२३" मध्ये सक्रीय सहभाग देणेबाबत...**

आपणास अवगतच आहे की, "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतीमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राज्यात राबविण्याचा संकल्प ग्राम विकास विभागाने केला आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सरपंच व ग्रामसेवक हा ग्राम विकासाचा कणा आहे. ग्रामीण भागासाठीच्या प्रत्येक योजनेची अंमलबजावणी आपल्या शिवाय होऊच शकत नाही. त्यामुळेच या अभियानामध्ये आपली भूमिका अतिशय महत्त्वाची आणि निर्णायक असणार आहे. **त्यासाठी अभियान कालावधीमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण सक्रीय सहभाग पुढीलप्रमाणे नोंदवावा.**

१. आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये अमृत महा आवास अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करुन लाभार्थी व ग्रामस्थांची क्षमता बाधंणी करावी.
२. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व लाभार्थी यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करुन गावातील कामाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणेसाठी तसेच अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी ग्राम कृती गटाचे गठन करावे.
३. गावात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांच्या बैठका, मेळावे आयोजित करुन घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भुमिपुजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. कार्यक्रम आयोजित करावे.
४. गावामध्ये बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरकुल बांधकामासाठी कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन त्यांच्या कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करावे.
५. भूमिहिन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गाने उपलब्ध होणाऱ्या जागांची लॅण्ड बँक तयार करणे. तसेच वाळू उपलब्धतेसाठी सॅण्ड बँक निर्मितीसाठी पाठपुरावा करणे.
६. सर्व घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देऊन शासन निर्णयातील परिशिष्टात दिलेल्या निकषावर काम करुन आपली ग्रामपंचायत राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी पात्र ठरावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
७. अभियानाची योग्य प्रकारे प्रचार व प्रसिध्दी करणे या करिता माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा यथोचित वापर करावा.

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**ग्रामविकास व पंचायत राज,**
**वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व**
**युवक कल्याण**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

आपणास माहित असेल की, समाजातील अनेक व्यक्ती किंवा संस्था स्वतःचे योगदान देऊन तसेच आर्थिक झळ सोसून अशा प्रकारे समाजसेवा करण्याची संधी शोधत असतात. मात्र आपण निश्चितच भाग्यवान आहात, की ग्रामीण भागातील गोरगरीब, दीनदुबळ्या जनतेची सेवा अशा प्रकारच्या शासकीय योजनेद्वारे आपल्या हातून आयतीच घडत आहे, आणि ती देखील कोणतीही वैयक्तिक झळ न सोसता! ही जाणीव ठेऊनच आपण सदर अभियाना दरम्यान आपणास दिलेले संपूर्ण उद्दिष्ट पूर्ण कराल याची मला खात्री आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना दि.२४/११/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार देवून गौरविण्यात आले. यावेळी आपण अथक परिश्रम करुन आपल्या ग्रामपंचायतीस पुरस्कार मिळवून द्याल, असा विश्वास वाटतो.

**अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या यशस्वीतेसाठी आपणास माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा..!**

(गिरीष महाजन)

**प्रति,**
**श्री/श्रीम............................................**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत ..........................................**

# मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे विभागीय आयुक्त यांना अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत पत्र

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मनु कुमार श्रीवास्तव
मुख्य सचिव

अ.शा.प.क्र.: प्रआयो-२०२३/प्र.क्र.४६/योजना-१०
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई – ४०० ००१.
दिनांक :-१६फेब्रुवारी, २०२३.

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण तसेच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार विकास योजना इत्यादी राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत.

२. राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी सन २०२०-२१ व सन २०२१-२२ यावर्षांमध्ये महा आवास अभियान टप्पा-१ व महा आवास अभियान टप्पा-२ राबविण्यात आले. राज्यात सदर महा आवास अभियान राज्यात राबविताना आपण व आपल्या अधिनस्त संबंधित यंत्रणेचे सक्रिय सहभाग घेवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल आपले व आपल्या सहकाऱ्यांचे अभिनंदन!

३. ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच मागील वर्षी महा आवास अभियानला प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेवून राज्य शासनाने **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** दि.२० नोव्हेंबर, २०२२ पासून राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यासाठी **अभियानाच्या उपक्रमांवर विशेष लक्ष देवून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

१. सदर अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण हा विषय आपले विषयपत्रिकेवर अग्रक्रमाने घ्यावा.

... २ ...

२. विभागीय टास्क फोर्सचे अध्यक्ष या नात्याने विभागातील भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना जागा देण्यासाठी युध्दपातळीवर कार्यवाही करावी.
३. गतिमान घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना सहजरीत्या वाळू उपलब्ध होणेसाठी महसूल यंत्रणेस (जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार/ तलाठी यांना) सूचित करावे.
४. अमृत महा आवास अभियानाचा नियमित साप्ताहीक आढावा घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करावे.
५. या अभियानांतर्गत राबवावयाचे उपक्रम हे ग्राम विकास विभाग, महसूल विभाग व इतर विभागांशी संबंधित असून त्या विभागांमध्ये समन्वय साधावा.

४. महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. तरी आपल्या मार्गदर्शनाखाली अमृत महा आवास अभियान - २०२२-२३ यशस्वीरित्या राबविण्याबाबत आपण व्यक्तीश: लक्ष घालून आपला विभाग राज्यात प्रथम पुरस्कार प्राप्त करील यासाठी प्रयत्न करावेत, शुभेच्छांसह..!

आपला स्नेहांकित

(मनु कुमार श्रीवास्तव) १६/२/२०२३

**विभागीय आयुक्त (महसूल) (सर्व).**

# मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग यांचे जिल्हाधिकारी यांना अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत पत्र

'२७

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
पहिला मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू
चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

email -deskm8.rfd@mah.gov.in ☎ ०२२-२२८२ १७४९

क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१०/म-८ दिनांक- १४ मार्च, २०२३

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व).

विषय :- अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत.

महोदय/महोदया,

"सर्वांसाठी घरे - २०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. सन २०२०-२१ व सन २०२१-२२ यावर्षांमध्ये महा आवास अभियान टप्पा-१ व महा आवास अभियान टप्पा-२ राबविण्यात आले. सदर अभियानात सक्रीय सहभागी होऊन केलेल्या कामाबद्दल प्रथमत: आपले मन:पूर्वक अभिनंदन!

यावर्षी देखील राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२२ ते दि.३१ मार्च २०२३ या कालवधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. या अभियानास देखील भरघोस प्रतिसाद आपणाकडून मिळेल, ही अपेक्षा आहे.

२. अमृत महा आवास अभियान अंतर्गत राबवावयाच्या १० उपक्रमांबाबतची माहिती ग्रामविकास विभाग यांचेकडील दिनांक १६/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत ग्रामीण गृहनिर्माणशी संबंधित केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात विशेष प्रयत्न करुन या योजनांची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यात यावी. त्याचप्रमाणे या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य / विभाग / जिल्हा / तालुका / ग्राम स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सदर अभियान यशस्वी करण्यासाठी व आपल्या जिल्ह्यास पुरस्कार मिळण्यासाठी आपण व्यक्तीश: लक्ष घालावे.

आपला,

(डॉ. नितिन करीर)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-
१. अप्पर मुख्य सचिव (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई-३२
२. विभागीय आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/अमरावती/नागपूर/औरंगाबाद
३. निवडनस्ती (कार्यासन म-८)

# मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत पत्र

महाराष्ट्र शासन

राजेश कुमार, भा.प्र.से.
अपर मुख्य सचिव

क्र.: प्रआयो-2023/प्र.क्र.१०/यो-१० 
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
महाराष्ट्र शासन
दिनांक : 07.02.2023

**विषय :- अमृत महा आवास अभियान २०२२-२३ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...**

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार विकास योजना इत्यादी राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण गृहनिर्माणचे धोरण राबविताना घरकुलांच्या कामाची प्रगती संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, तसेच नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुल उपलब्ध करुन दयावे, त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा या बाबी प्रकर्षाने विचारात घेण्यात येत आहेत.

आतापर्यंत ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रम तसेच सन २०२०-२१ व सन २०२१-२२ यावर्षांमध्ये महा आवास अभियान टप्पा-१ व महा आवास अभियान टप्पा-२ राबविण्यात आले. राज्यात सदर महा आवास अभियान-ग्रामीण राबविताना आपण व आपले अधिनस्त संबंधित सहकार्यांना सक्रिय सहभाग देवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल आपले व आपल्या सहकार्यांचे अभिनंदन..!

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच मागील वर्षी महा आवास अभियान ग्रामीणला प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेवून राज्य शासनाने **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** दि.२० नोव्हेंबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला असून **या अभियानाच्या पुढील १० उपक्रमांवर विशेष लक्ष द्यावे.**

१. भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामसाठी विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जागा उपलब्ध करुन देणे. तसेच कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात बहुमजली इमारती, गृहसंकुले उभारणे व ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे.
२. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे सर्व घरकुलांना विनाविलंब १०० टक्के मंजूरी देणे.
३. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण कमीत कमी वेळेत करणे. पुढील सर्व हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत करणे.
४. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. याकरीता लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम साहित्य उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट सुरु करणे व लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी 'सॅण्ड बँक' ची निर्मिती करणे.
५. प्रलंबित घरकुले पूर्ण करणे. सदर घरकुले पूर्ण करणेकामी 'लोक अदालत' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले रिफंड करुन रिमांड करणे .
६. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे.
७. इंदिरा आवास योजनेंतर्गत उर्वरीत सर्व घरकुले पूर्ण करणे व क्षेत्र अधिकारी ॲप वापरणे.
८. सामाजिक लेखापरीक्षण वेळेत करणे.
९. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करणे. तसेच दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, अपार्टमेंट यांना मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, इ. उपलब्ध करुन देणे.
१०. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी लाभार्थ्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे. त्याचप्रमाणे घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञानासह फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करणे. घरावर ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद इ. बाबींची पूर्तता करणे.

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना दि.२४/११/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार देवून गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. या संदर्भात पुरस्कार प्राप्त करून घेण्यासाठी सक्रिय सहभाग आवश्यक आहे. "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करण्यासाठी व सदर अभियान यशस्वी करण्यासाठी आपण व्यक्तीश: लक्ष देवून आपला व आपल्या कार्यालयाचा सक्रीय सहभाग नोंदवावा.

**राजेश कुमार, भा.प्र.से.**
**अतिरिक्त मुख्य सचिव**

**प्रति,**
**अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा**
**मख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

## मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम विकास विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पुणे येथे राज्यस्तरीय दोन दिवसीय कार्यशाळा

ग्राम विकास विभागाच्या योजना गतीमान करून, तळागळातील लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व ग्राम विकास विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने पुणे येथील आर्किड हॉटेल मध्ये दिनांक ४ ते ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा शुभारंभ मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या कार्यशाळेला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त ( विकास) , उपायुक्त (आस्थापना), अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), राज्य स्तरावरील सर्व अधिकारी व कार्पोरेट कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांनी सादर केले.

त्यानंतर मा. मंत्री महोदयांनी विविध कॉर्पोरेट कंपन्यांशी भागिदारीची घोषणा व उपस्थितांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील गरिब, गरजू, भूमिहीन व बेघर लोकांना हक्काचे पक्के घरकुल देण्यासाठी अमृत महा आवास अभियानात सक्रीय सहभाग नोंदवून अभियान कालावधीत ५ लाख घरे पूर्ण करण्याचे आवाहन मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी सर्व ग्राम विकास विभागातील यंत्रणेला केले. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजना गतीमान करण्याचे नियोजन व अंमलबजावणी करणे, तसेच जिल्हयांनी सुरू केलेल्या नाविण्यपूर्ण योजना व यशोगाथांचे सादरीकरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावतीने करण्यात आले.

या कार्यशाळे मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्ताने राज्यात राबविण्यात येत असलेले अमृत महा आवास अभियान व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीचे सादरीकरण मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघेयांनी केले. तसेच ग्राम विकास विभागाच्या इतरही योजनांचे सादरीकरण ग्राम विकास विभागाच्या वरीष्ठ अधिकारी यांनी केले.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सुधारित ग्राम स्वराज अभियान (RGSA) अंमलबजावणी, बचत गटाच्या उत्पादनांना बाजार जोडणी इ. विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच व्हिएसटीएफ अंतर्गत कार्पोरेट कंपन्यासोबत सामंजस्य करार व कॉर्पोरेट कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून मनोगत व्यक्त करण्यात आले.








## मा. उप महा संचालक (ग्रामीण गृहनिर्माण), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व कार्यकारी समितीची बैठक संपन्न

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे मा. उप महा संचालक, श्री. गया प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली देशभारतील सर्व राज्यांची पूर्व कार्यकारी समितीची बैठक दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी दूरदृष्य प्रणालीव्दारे संपन्न झाली. या बैठकीला महाराष्ट्र राज्याच्या वतीने मा. संचालक, राज्यव्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा. उप महा संचालक यांनी महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. तसेच कार्यकारी समितीच्या बैठकी बाबत मार्गदर्शन केले.



## मा. केंद्रीय गृह राज्यमंत्री यांच्या शुभहस्ते देवरूख येथे डेमो हाऊसचे लोकार्पण

मा. केंद्रीय गृह राज्यमंत्री, भारत सरकार श्री. अजय कुमार मिश्रा यांच्या शुभहस्ते व माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जिल्हा परिषद रत्नागिरी श्री. कीर्ती किरण पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी देवरुख पंचायत समिती आवारातील डेमो हाऊसचे उद्‌घाटन व लोकर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रत्नागिरीच्या प्रकल्प संचालक श्रीमती नंदिनी घाणेकर जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.राहुल देसाई, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग) श्रीमती मयुरी पाटील, पंचायत समिती देवरूखचे गट विकास अधिकारी श्री. चौगुले यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंचायत समिती आवारात बांधण्यात आलेले डेमो हाऊस हे अत्यंत चांगल्या पध्दतीने बांधण्यात आले असून हे घरकुल लाभार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल असे मा. केंद्रीय गृह राज्यमंत्री श्री. अजय कुमार मिश्रा यांनी सांगितले.



## मा. उप सचिव (ग्रामीण गृहनिर्माण), ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण गृहनिर्माण अंमलबजावणी यंत्रणेची क्षमता बांधणी

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे मा.उप सचिव (ग्रामीण गृहनिर्माण), श्री.शक्तीकांत सिंग यांनी दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०२३ या कालावधी मध्ये महाराष्ट्र राज्याचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पंचायत समिती राहाता येथे मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत व राज्य व्यवस्थापन कक्षाचे उप संचालक श्री. नीलेश काळे, राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव, राज्य समन्वयक (संनियंत्रण व मूल्यमापन) डॉ. संघरत्न सोनवणे, वास्तुविशारद श्री. परमेश्वर शेलार, राज्य प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद) श्री. दिनेश मोवळे यांचेसह अहमदनगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहा. प्रकल्प अधिकारी श्री. सावळे, राहाता पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. जालिंदर पठारे व राहाता तालुकास्तरीय अधिकाऱ्यांशी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रगती बाबत सविस्तर चर्चा केली. तसेच मा. उप सचिव यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र गतिमान करण्यासाठी दूरदृष्य प्रणाली व्दारे मार्गदर्शन केले.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान मा. उप सचिव (ग्रामीण गृहनिर्माण) यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पंचायत समिती राहाता अंतर्गत ग्रामपंचायत लोणी बु. येथील गृहसंकुलास भेट देवून लाभार्थ्यांशी चर्चा केली. तसेच पंचायत समिती कोपरगाव मधील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात आलेल्या डेमो हाऊसची पहाणी व पंचायत समिती कोपरगाव अंतर्गत ग्रामपंचायत दर्डे कोऱ्हाळे येथील बहुमजली इमारतीला भेट देवून लाभार्थ्यांशी चर्चा केली.






## अमृत महा आवास अभियानांतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम

अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करण्यात येत आहे. तसेच गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन(Assessment) पूर्ण करुन सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली.

यामध्ये माहे जानेवारी ते मार्च २०२३ याकालावधीत कोल्हापूर, पालघर, पुणे, भंडारा, गोंदिया, रायगड व राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यात येत असून कुशल गंवड्याची निर्मिती होत आहे.

## रमाई आवास योजनेबाबत 'दिशा'त वेधले लक्ष

दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा नियोजन भवन, सोलापूर येथे संपन्न झाली. या बैठकीला मा. खासदार श्री. ओमराजे निंबाळकर, मा. आमदार श्री. बबनदादा शिंदे, महापालिका आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती वर्षा लांडगे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री.बाळासाहेब शिंदे, उप मुख्य कार्यकारी श्री. अधिकारी ईशाधीन शेळकंदे, करमाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. मनोज राऊत उपस्थित होते. तसेच मा.खासदार श्री. रणजितसिंह नाईक निंबाळकर व मा.आमदार श्री. समाधान आवताडे दूरदृष्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.

यावेळी करमाळा तालुक्यातील रमाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे नरेगा वर्क कोड येत नसल्यामुळे लाभार्थ्यांचे 20 हजाराचे नुकसान होत असल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आली. यावर गटविकास अधिकारी श्री.राऊत यांनी समितीसमोर येणारी तांत्रिक अडचण मांडली असता हा प्रश्न मार्गी लावाण्याच्या सूचना मा.खासदार ओमराजे निंबाळकर यांनी संबंधितांना दिल्या.



## हिंगोली जिल्ह्यात नव वर्षाच्या मुहूर्तावर गृहप्रवेश व भूमीपूजन कार्यक्रमाचे आयोजन

हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय दैने यांच्या संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. नामदेव केंद्र यांच्या मागदर्शनाखाली नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर केंद्र व राज्य पुरुस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत पंचायत समिती हिंगोली येथे दिनांक ०१ जानेवारी, २०२३ रोजी घरकुल लाभार्थींचे गृहप्रवेश व भूमिपुजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी हिंगोली तालुक्यातील विविध गावातील १५५ घरकुल लाभार्थ्यांचे गृहप्रवेश व ३२० घरकुलाचे भुमीपुजन करण्यात आले आहेत.

याप्रसंगी लाभार्थींचे गृहप्रवेश व भूमिपुजन कार्यक्रमासाठी हिंगोली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. गणेश बोथीकर, नोडल अधिकारी शिवराज तुप्पड, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सांगली जिल्ह्यात शाश्वत व सर्वांगिण ग्राम विकासासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

जिल्हा परिषद सांगलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. दिपक चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत शाश्वत व सर्वांगिण ग्रामविकासासाठी सरपंच, उप सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, मिरज पंचायत समितीचे सर्व खातेप्रमुख, क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांची एक दिवशीय कार्यशाळा पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह, पंचायत समिती मिरज येथे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेण्यात आली.

या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तानाजी लोखंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) श्री. विजयसिंह जाधव, ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील श्री. संजय येवले, पंचायत समिती मिरजचे गट विकास अधिकारी श्री. सतिश पाटील व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वी राबविण्यासाठी बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच प्रकल्प संचालक श्री. दिपक चव्हाण यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कत आवास योजनांची माहिती देवून अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी सरपंच व ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना आवाहन केले.



## मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आढावा बैठका

अमृत महा आवास अभियान २०२२-२३ व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत माहे जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत नियमित आढावा बैठका घेण्यात आल्या. या बैठकांना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत १० उपक्रमनिहाय प्रगती तसेच केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगती बाबत जिल्हानिहाय सादरीकरण केले. त्याचप्रमाणे राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत माहिती दिली.

या बैठकांमध्ये मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत सर्व उपक्रमांची उद्दिष्टपूर्ती करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागेची उपलब्धता करणे, सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे, घरकुल बांधकाम गतीने करणे, प्रलंबित घरकुले तात्काळ पूर्ण करणे व नावीन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांना केल्या. त्याचप्रमाणे दिनांक २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या मोहीमेत सक्रीय सहभाग नोंदविण्याचे आवाहन मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी सर्व यंत्रणेला केले.




## अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या यशस्वीतेसाठी मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या साप्ताहीक बैठकांचे सत्र

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतीमानता व गुणवत्ता आणणेसाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या आवास दिनापासून अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राबविण्यात येत असून या अभियानत ५ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या अभियानाच्या उद्दिष्टपूर्ती व यशस्वीतेसाठी मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी माहे जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत नियमित साप्ताहीक आढावा बैठका घेतल्या.

या बैठकांना दूरदृष्य प्रणालीव्दारे सर्व उपायुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, लेखाधिकारी, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते.

या बैठकांमध्ये मा. संचालक यांनी अभियानातील १० उपक्रमांच्या जिल्हा व तालुकानिहाय आढावा घेतला. अभियान कालावधीत सर्व उपक्रमावर लक्ष केंद्रीत करून जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्यासाठी अमृत महा आवास अभियानांतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी व अभियानाची प्रचार, प्रसिध्दी करण्याच्या सूचना मा. संचालक यांनी दिल्या. तसेच सर्व घरकुलांना मंजुरी देणे, मंजूर घरकुलांना पहिला हप्ता त्वरीत वितरण करून सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, दिनांक २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च, २०२३ या कालावधीत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहीमेमध्ये सक्रीय सहभाग घेणे, व अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करणे, अशा सुचना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांनी केल्या.

तसेच अभियान कालावधीतील कामांची पहाणी करण्याकरीता मा. संचालक यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये क्षेत्रीय भेटी दिल्या. तसेच अभियान कालावधीत उद्दिष्टपूर्तीसाठी शासकीय यंत्रणा, पदाधिकारी, ग्रामस्थ व लाभार्थी यांना वेळोवेळी प्रोत्साहीत केले.




प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण – भौतिकदृष्ट्या पूर्ण घरकूले

| Sr. No. | Division | Total sanctions upto 28.11.22 | Total completion upto 28.11.22 | ABHIYAN Target on 20.11.22 | Completion 20.11.21 to 28.11.22 | % | Remaining | Avg. Completed Per Day From 20.11.22 to 11.01.22 | To be Completed in Per Day till 31.03.23 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KONKAN DIV. | 69263 | 50152 | 19855 | 744 | 72.4 | 19111 | 14 | 242 |
| 2 | PUNE DIV. | 130011 | 79842 | 52589 | 2420 | 61.4 | 50169 | 47 | 635 |
| 3 | NAGPUR DIV. | 291159 | 213415 | 83031 | 5287 | 73.3 | 77744 | 102 | 984 |
| 4 | AMRAVATI DIV. | 272844 | 162503 | 115687 | 5346 | 59.6 | 110341 | 103 | 1397 |
| 5 | NASHIK DIV. | 410768 | 296762 | 127254 | 13248 | 72.2 | 114006 | 255 | 1443 |
| 6 | AURANGABAD DIV. | 236748 | 114528 | 129187 | 6967 | 48.4 | 122220 | 134 | 1547 |
| | TOTAL | 1410793 | 917202 | 527603 | 34012 | 65.0 | 493591 | 654 | 6248 |

# अमृत महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या क्षेत्रिय भेटी

राज्यात राबविण्यात येत असलेल्या अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी विविध जिल्ह्यांना क्षेत्रीय भेटी देवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पहाणी केली व आवश्य मार्गदर्शन केले.

यामध्ये दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी उपसंचालक श्री. नीलेश काळे व वास्तुविशारद श्री. परमेश्वर शेलार यांनी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील घरकुलांची पहाणी केली. तसेच लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.



राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील पंचायत समिती कन्नड अंतर्गत ग्रामपंचायत नेवपूर खा. येथील बहुमजली इमारत व विविध आवास योजनांच्या कामांची पहाणी केली. दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी जिल्हा परिषद हिंगोली येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. नामदेव केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत १० उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच कळमनुरी तालुक्यातील ग्रामपंचायत तुप्पा येथील बहुमजली इमारतीची पहाणी व विविध घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना घरकुले पूर्ण करण्याबाबत प्रोत्साहीत केले. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती हिमायतनगर अंतर्गत बहुमजली इमारत व गृह संकुलाची पाहणी केली. दिनांक २०जानेवारी, २०२३ रोजी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती भोकर येथे डेमो हाऊसला भेट दिली व ग्रामपंचायत केसराळी येथे बहुमजली इमारती व गृह संकुलाची पाहणी करत तांत्रिक अडचणी बाबत मार्गदर्शन केले. दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व सर्व राज्य पुरस्कृत आवास योजने अंतर्गत जिल्हा ग्रामीण



विकास यंत्रणा, नांदेड येथे औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यांची अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी मोहिम राबविली. यावेळी श्री. राम आघाव यांनी घरकुले पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मार्गी लावून मोठ्या प्रमाणात घरकुल उद्दिष्टपूर्ती केली.

दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले यांनी वाशिम जिल्ह्यातील पंचायत समिती रिसोड अंतर्गत लोणी बु . व कोयाळी बु मधील बहुमजली इमारतीची पाहणी केली. दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी यवतमाळ येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.श्रीकृष्ण पांचाळ व प्रकल्प संचालक श्रीमती वैशाली रसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अमृत महा आवास अभियान व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. तसेच श्रीमती मंजिरी टकले यांचे हस्ते ११२२ लाभार्थीना एकाच दिवशी मंजुरी दिली. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत मंजुरी दिलेली सर्व घरकुले ३१ मार्च २०२३ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे जिल्ह्यातील सर्व लाभार्थीना आवाहन करण्यात आले. त्यानंतर जिल्हास्तरीय डेमो हाउसला भेट दिली व कळंब पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायत मेंढला येथे घरकुलांची पाहणी व लाभार्थ्यांशी संवाद साधला.



दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी २०२३ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड येथे औरंगाबाद विभागातील अपुर्ण घरकुल पूर्ण करण्यासाठी मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे यांनी सहभाग नोंदविला. तसेच त्यांनीनी प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी देवून नांदेड जिल्ह्यातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी केली व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर लेखा विषयक कामकाजाची तपासणी केली.



## विकास मंत्रालय, भारत सरकारच्या ग्रामीण अधिकाऱ्याची आशियाना प्रकल्पास भेट

दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात आलेली "आशियाना प्रकल्प" मधील घरकुलांना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारच्या समन्वयक श्रीमती सोनाक्षी वर्षानी यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माणचे वास्तूविशारद श्री. परमेश्वर शेलार व पंचायत समिती वाडाचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत Rotary ३१४१ यांनी घरकुल बांधकामाकरीता अतिरिक्त रक्कम रु. ७०,०००/- अर्थसहाय्यातून गुणवत्तापूर्ण घरकुलाची निर्मिती केली आहे. Rotary ३१४१ अर्थसहाय्यातून उभारलेल्या या घरकुल प्रकल्पास "आशियाना प्रकल्प" असे नाव देण्यात आले आहे.

"आशियाना प्रकल्प" भेटी दरम्यान वाडा पंचायत समितीचे संपर्क अधिकारी श्रीमती अपर्णा पाटील, जिल्हा प्रोग्रामर श्री. धनजंय पाटील, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. भूषण वाघमारे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. सौरभ पाटील व श्रीमती उज्वला धूम उपस्थित होते.



## घरकुले पूर्ण करण्यासाठी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात विशेष मोहीम राबविली

दिनांक १० मार्च, २०२३ रोजी सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र डूडी यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांची आवास कक्ष वार रूम मध्ये बैठक घेतली. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्ण करण्यासाठी जत तालुक्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकारी यांनी दिल्या.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जत पंचायतसमितीचे गटविकास अधिकारी व आवास कक्ष वॉर रूम मधील सर्व अधिकारी कर्मचारी यांना विशेष मोहीम राबवितांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये जत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांचा आवास योजनांच्या कामाबाबत आढावा घेणे, लाभार्थ्यांना गृह भेटी देवून घरकुल बांधकाम सुरू करणे, पहिला हप्ता घेऊनही घरकुल बांधकाम सुरू केले नाही अशी घरकुले रद्द करणे, बांधकामाच्या टप्प्यानुसार हप्ता मागणी करणे, भूमिहीन लाभार्थ्यांचे जागेची अडचण दूर करणे, गृह संकुल व बहुमजली इमारतीची उभारणी करणे, इ. उपक्रम राबवून जत तालुक्यामध्ये ३ दिवस विशेष मोहीमे राबवून मोठ्या प्रमाणात घरकुले पूर्ण करण्यात आली.




## नागपुरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून घरकुल बांधकामाची तपासणी

दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांनी पंचायत समिती पार शिवनी अंतर्गत ग्रामपंचायत निबा व चार गाव येथे क्षेत्रीय भेट देवून विविध आवास योजनांच्या कामाचा आढावा घेतला व घरकुलांची पहाणी केली.

या क्षेत्रीय भेटी दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांनी घरकुल बांधकामांना भेटी देवून बांधकामाचा दर्जा व पूर्ण झालेल्या घरकुलांची तपासणी केली. तसेच अपूर्ण व घरकुलांचे बांधकाम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम सुरु करण्याचे सुचित केले.



## घरकुल योजनांच्या कामांना गतिमान करा - श्री. एच.पी. तूम्मोड,जिल्हाधिकारी, बुलढाणा

दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. एच.पी.तूम्मोड यांनी बुलढाणा तालुक्यातील ग्रामपंचायत गुम्मी क्षेत्रीय भेट देवून घरकुल कामांची पाहणी केली.

या क्षेत्रीय भेटी दरम्यान जिल्हाधिकारी श्री.एच.पी.तूम्मोड यांनी ग्रामपंचायत गुम्मी गावातील घरकुल योजनांचा आढावा घेतला. तसेच वाळू उपलब्धता व भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता या विषयी मार्गदर्शन केले. घरकुल लाभार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रगतीत असलेल्या घरकुल बांधकामांना भेटी देवून कामाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच घरकुल योजनांचे काम गतिमान करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या.



## सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वर्धा यांचेकडून जिल्हाभर आढावा बैठका व क्षेत्रीय भेटी

राज्यात अमृत महा आवास अभियान व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गतिमान करून दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे यांनी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर आढावा बैठका व घरकुल योजनांच्या कामांना क्षेत्रीय भेटी देण्याची मोहीम राबविली.

यामध्ये दिनांक ०६ जानेवारी २०२३ रोजी मुख्य कार्यकारी यांनी पंचायत समिती हिंगणघाट येथे घरकुल योजनांच्या कामांचा आढावा घेतला. तसेच याच तालुक्यातील ग्रामपंचायत अल्लीपूर, वाघोली, काचणगाव व येरणगाव येथे भेट देवून घरकुल योजनांच्या कामांची पाहणी केली. त्याचप्रमाणे दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी पंचायत समिती कारंजा व आष्टी पंचायत समितीची संयुक्त आढावा बैठक श्री. रोहन घुगे यांनी घेवून घरकुल योजनांचे निर्धारीत लक्ष्यांक ३१ मार्च पर्यंत पुर्ण करण्याचे निर्देश दिले.

दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२३ रोजी श्री. रोहन घुगे यांनी वर्धा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीचा गावनिहाय ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी यांचा अपूर्ण घरकुल बाबत आढावा घेऊन घरकुले ३१ मार्च २०२३ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सर्व गट विकास अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन घरकुलांच्या लाभापासून कोणीही वंचित राहू नये याकरिता ३ १ मार्चपर्यंत युद्धपातळीवर मंजूर घरांची सर्व कामे नियोजनबद्ध पध्दतीने करण्याचे सूचित केले. दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२३ रोजी पंचायत समिती सेलू येथे आढावा बैठक घेवून अपूर्ण असलेली घरकुले मार्च अखेर पूर्ण करणे, सर्व हप्ते वितरित करणे, घरकुल बांधकामासाठी बचत गटा मार्फत कर्ज स्वरूपात मदत करणे, नोडल अधिकारी नेमून गृह भेटी देणे, घरकुल बांधकामास जागेची उपलब्धता करून देणे व अतिक्रमण नियमाकुल करणे, इ. बाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

त्याचप्रमाणे दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२३ रोजी श्री.घुगे यांनी पंचायत समिती वर्धा अंतर्गत ग्रामपंचायत सावंगी मेघे येथे अपूर्ण घरकुलांचा आढावा घेवून अपूर्ण घरकुले ३१ मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना लाभार्थ्यांना दिल्या. त्याचप्रमाणे बचत गटातील महिला, आशा वर्कर, MSRLM चे कर्मचारी मार्फत घरकुलांना भेटी देऊन घरकुले पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच कमी कालावधीत व कमी खर्चात घरकुल बांधकाम करणे, २६९ चौ. फूट मध्ये घरकुल बांधकाम, घरकुल बांधकामात कुत्रीम रेती व फोम वीटचा वापर या बाबत ग्रामस्थ व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे यांच्या आढावा बैठकी व दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांच्या समवेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विश्वास सिद व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.





## मा. आमदार यांच्या अध्यक्षतेखाली भुदरगड येथे घरकुल योजनांची आढावा बैठक संपन्न

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समिती भुदरगड येथे मा. आमदार श्री. प्रकाशराव अबीटकर यांच्या अध्यक्षतेखाली व कोल्हापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती देसाई यांच्या प्रमुख उपस्थिती दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत विविध घरकुल योजनांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीमध्ये अमृत महा आवास अभियान अंतर्गत १० उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच मंजूर घरकुले बांधकाम सुरू न करणारे लाभार्थी व अपूर्ण घरकुले असलेले लाभार्थी यांचा योजना निहाय आढावा घेतला. यावेळी मा. आमदार श्री. प्रकाशराव अबीटकर यांनी सर्व लाभार्थ्यांना घरकुले पूर्ण करण्याचे आवाहन केले. तसेच लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता सर्वोत्तोपरी सहकार्य करण्याच्या सूचना तालुकास्तरीय यंत्रणेला दिल्या.

या आढावा बैठकीला पंचयायत समितीचे भुदरगडचे गट विकास अधिकारी श्री. गावडे, सांख्यिकी विस्तार अधिकारी श्री. दबडे, जिल्हा, पंचायत समितीचे अधिकारी, तालुक्यातील ग्रामपंचायतींचे पदाधिकारी व घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अकोला जिल्हा दिशा समिती सभेत घरकुल योजनांचा आढावा व १२०० घरकुलाचे भूमिपूजन

मा. आमदार श्री. रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. आमदार श्री. हरीश पिंपळे, मा. अध्यक्ष जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी अकोला श्रीमती निमा अरोरा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटीयार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. मनोज जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी अकोला जिल्ह्याची दिशा समिती सभा संपन्न झाली.

या सभेमध्ये मा. अध्यक्ष यांनी सर्व विभागांसह सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचाही आढावा घेऊन घरकुल योजनांची कामे गतिमान पध्दतीने व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. तसेच याप्रसंगी सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत १२०० घरकुलांचे भूमिपूजन मा.अध्यक्ष दिशा समिती तथा मा. आमदार श्री. रणधीर सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले.



## नांदेड येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला आवास योजनांचा आढावा

दिनांक १० मार्च, २०२३ रोजी जिल्हा परिषद नांदेडचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती हिमायतनगर येथे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पहिला हप्ता वितरण व पहिला हप्ता घेऊन अद्यापही घरकुल बांधकाम सुरु केले नाही अशा लाभार्थ्यांचा ग्रामपंचायत निहाय आढावा घेण्यात आला.

या बैठकीला पंचायत समिती हिमायतनगरचे गट विकास अधिकारी श्री. मयूरकुमार आंदेलवाड, विस्तार अधिकारी श्री. धर्मेकर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. नाईक, श्री. सोनटक्के, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक श्री.विशाल, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. स्वप्निल भद्रे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, सरपंच, रोजगार सेवक व इतर अधिकारी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे दिनांक ११ मार्च, २०२३ रोजी श्री. संदीप माळोदे यांनी पंचायत समिती किनवट येथे आढावा बैठक घेतली. या बैठकीला पंचायत समिती किनवटचे गट विकास अधिकारी श्री. वैष्णव, विस्तार अधिकारी श्री. शिंदे, श्री. ढवळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामसेवक/ग्रामविकस अधिकारी इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये विविध आवास योजनांतर्गत घरकुलांची कामे दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना श्री. संदीप माळोदे यांनी दिल्या.



# अमृत महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परभणी जिल्ह्यात बैठका व दौरे

अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी परभणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांनी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय यंत्रणेच्या बैठका व क्षेत्रीय भेटी देवून कामांची पहाणी केली.

यामध्ये दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय यंत्रणा व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांची आढावा बैठक घेतली. दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी जिंतूर तालुक्यातील ग्रामपंचायत सावंगी म्हालसा येथे श्रीमती खांडेकर यांनी लघु पाठबंधारे विभागाच्या क्षेत्रात अतिक्रमित असणाऱ्या लाभार्थ्यांशी चर्चा केली व जागेची पाहणी केली. दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी मानवत तालुक्यातील ग्रामपंचायत रामेटाकळी येथे श्रीमती. रश्मी खांडेकर यांच्या हस्ते घरकुल मार्ट व लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळा संपन्न झाला. तसेच घरकुलांच्या कामांची तपासणी केली. तसेच दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी जिंतूर तालुक्यातील ग्रामपंचायत सावळी बु येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय लाभार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी घरकुलाची पाहणी व घरकुल मार्टचे उद्घाटन त्यांनी केले.



दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी श्रीमती खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह परभणी येथे आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत प्रथम व द्वितीय हप्ता वितरण करणे, अपूर्ण घरकुल पूर्ण करणे, आवास योजना अंतर्गत प्रस्तावा बाबत त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव सादर करणे व अमृत महा आवास अभियानांतर्गत १० उपक्रमांची उद्दिष्टपूर्ती करणे, अशा सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप घोन्सिकर, जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, आपले सरकार सेवा केंद्राचे तालुका व्यवस्थापक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे शाखा अभियंता व सहायक प्रकल्प अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकल्प संचालक श्रीमती खांडेकर यांनी जिल्हास्तरीय डेमो हाऊस बांधकामाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग श्री. उडानशिवे व शाखा अभियंता श्री. एस. एस. वसेकर उपस्थित होते.



# ३१ मार्च २०२३ पर्यंत घरकुले पूर्ण करण्याचे चंद्रपुर प्रकल्प संचालक यांचे आदेश

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राबविण्यात येत असून या अभियान घरकुले पूर्ण करण्यासाठी चंद्रपुर जिल्ह्यात सर्वोत्तोपरी प्रयत्न सुरू आहेत. त्याकरीता चंद्रपुर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती सुवर्णा चव्हाण यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी पंचायत समिती वरोरा येथे अमृत महा आवास अभियानांतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला.

या बैठकीमध्ये श्रीमती सुवर्णा चव्हाण यांनी अमृत महा आवास अभियानांतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत घरकुले पूर्ण करण्याचे आदेश दिले. तसेच वरोरा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना अपूर्ण घरकुले लवकरात लवकर पूर्ण करणे, घरकुलांना मंजूरी देणे, लाभार्थ्यांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करणे, डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप सुरू करणे, जास्तीत जास्त घरकुल मार्ट सुरू करणे, बँक मेळावे घेवून गृह कर्जाची उपलब्धता करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचे आयोजन करणे व शासकीय योजनांच्या कृती संगमातून घरकुल लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ देणे, अशा सुचना दिल्या.

या आढावाबैठकीला वरोरा पंचायत समितीचे सहायक गट विकास अधिकारी श्री. बक्षी, विस्तार अधिकारी श्री. अत्राम, श्री. सरुळकर, श्री.भोयर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, सरपंच, ग्रामसेवक, घरकुल लाभार्थी व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते ग्रामीण गृहनिर्माण फोटो प्रदर्शनाचे उद्‌घाटन

मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व ग्राम विकास विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने पुणे येथील आर्किड हॉटेल मध्ये दिनांक ४ ते ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेतील ग्रामीण गृहनिर्माण फोटो प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या फोटो प्रदर्शनामध्ये महा आवास अभियान संकल्पना विकसन व धोरण, अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा, ग्रामस्तरीय कार्यशाळा, ग्रामकृती गटाचे गठण, लाभार्थी मेळावे, आढावा बैठका, व्हिडीओ कॉन्फरन्स, क्षेत्रीय भेटी, घरकुल मंजुरी पत्र वितरण, हप्ते वितरण, भूमिपूजन, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, प्रगतीतील घरकुले, राष्ट्रीय लोक अदालत, घरकुल मार्ट, पुर्ण घरकुले, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी, डेमो हाऊस, कॉप-शॉप, आय.आय.टी. मुंबई यांचे ग्रामीण गृहनिर्माण प्रशिक्षण, लॅण्ड बँक, सॅण्ड बँक, शासकीययोजनांशी कृती संगम, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, समन्वय उपक्रम, पार्टनरशिप व कोलॅबरेशन, मिडिया कव्हरेज, राज्या बाहेरील अभ्यास दौरे, ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण, इ. उपक्रमांच्या फोटोंचा समावेश करण्यात आला होता.



## मा. मंत्री, कामगार यांच्या शुभहस्ते जिल्हास्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. या अभियान कालावधीत सांगली जिल्ह्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती व संस्था यांना दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी मा. मंत्री, कामगार तथा सांगली जिल्ह्याचे मा. पालकमंत्री श्री. सुरेश खाडे यांच्या शुभहस्ते व मा. खासदार श्री. संजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद सांगली येथे महा आवास अभियान २.० पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

या पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी सांगलीचे जिल्हाधिकारी श्री. दयानिधी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओसवाल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. दिपक चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी वितरीत करण्यात आलेले पुरस्कार

१) प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण पुरस्कार

सर्वोत्कृष्ट तालुका - प्रथम क्रमांक - कवठेमहाकाळ, द्वितीय क्रमांक - खानापूर, तृतीय क्रमांक - आटपाडी

सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार - प्रथम क्रमांक - हिरवे, द्वितीय क्रमांक - पाडळीवाडी, तृतीय क्रमांक - येळापूर

सर्वोत्कृष्ट क्लस्टर पुरस्कार - प्रथम क्रमांक - लेंगरे, द्वितीय क्रमांक - आरग, तृतीय क्रमांक - चिकुर्डे

२) रमाई आवास योजना - ग्रामीण पुरस्कार

सर्वोत्कृष्ट तालुका - प्रथम क्रमांक - शिराळा, द्वितीय क्रमांक - खानापूर व क.महांकाळ, तृतीय क्रमांक - पलूस

सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार - प्रथम क्रमांक - अगळगाव, द्वितीय क्रमांक - विठुरायाचीवाडी, तृतीय क्रमांक - आळसंद

सर्वोत्कृष्ट क्लस्टर पुरस्कार - प्रथम क्रमांक - भावळणी, द्वितीय क्रमांक - मांगले, तृतीय क्रमांक - वाटेगाव

पुरस्कार विजेत्यांना मा. मंत्री, कामगार तथा सांगली जिल्ह्याचे मा. पालकमंत्री श्री. सुरेश खाडे यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.





## मा. आमदार यांच्या शुभहस्ते शिराळा येथे भूमिपूजन व गृहप्रवेश कार्यक्रम संपन्न

दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी अमृत महा आवास अभिमान २०२२-२३ अंतर्गत पंचायत समिती शिराळा मधील ग्रामपंचायत मांगले येथे मा. आमदार श्री. मानसिंगराव नाईक (भाऊ) यांच्या शुभहस्ते घरकुल भूमिपूजन व गृहप्रवेश कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून घरकुल बांधकामास गती मिळण्यास मदत झाली आहे.

याप्रसंगी शिराळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. संतोष राऊत, संपर्क अधिकारी श्री. मनोज जाधव,सरपंच श्री. प्रल्हाद पाटील, उपसरपंच श्री. तानाजी जमदाडे, ग्रामविकास अधिकारी श्री. एस. एस. पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ व घरकुल लाभार्थी उपस्थित होते.



## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात ग्रामीण गृहनिर्माण योजना माहिती दर्शक स्टॉलची उभारणी

दिनांक ०१ ते ०५ जानेवारी, २०२३ या कालावधीत औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन पाहण्यास येणाऱ्या नागरीकांना राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती मिळावी. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती व्हावी या हेतून या प्रदर्शनात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा औरंगाबादने ग्रामीण गृहनिर्माण योजना माहिती दर्शक स्टॉलची उभारणी केली.

या स्टॉल मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनाची माहिती दर्शविणारे फलक व अमृत महा आवास अभियान २०२२-२३ चे फलक लावण्यात आले. तसेच स्टॉलला भेट देणाऱ्या नागरिकांना डेमो हाऊस दाखवून त्या प्रमाणे घरकुल बांधकाम करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अशा प्रकारे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची जनजागृती या कृषी प्रदर्शनात करण्यात आली.

याप्रसंगी कृषी आयुक्त श्री. सुनील चव्हाण, औरंगाबाद जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती. संगीतादेवी पाटील, घरकुल जिल्हा समन्वयक श्री.एन. टी. डोंगरे, जिल्हा प्रोग्रामर श्री. सुदेश रोकडे व निलेश राठोड यांच्यासह इतरही मान्यवर, लोक व लाभार्थ्यांनी ग्रामीण गृहनिर्माण योजना माहिती दर्शक स्टॉलला भेटी दिली. या माध्यमातून अमृत महा आवास अभियान २०२२-२३ ची जनजागृती करण्यास मदत झाली.



## भंडारा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते कॉप-शॉप चा शुभारंभ

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यातील प्रत्येक पंचायत समिती आवारात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली. या तालुकास्तरीय डेमो हाऊसला घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटींचे आयोजन करण्यात येते.

तसेच या डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप सुरु करण्यात येत आहे.

दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजीच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. समीर कुर्तकोटी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विवेक बोंद्रे यांचे हस्ते पंचायत समिती भंडारा येथील डेमो हाऊस मधे उमेद अभियाना अंतर्गत कॉप-शॉपचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी श्रीमती. संघमित्रा कोल्हे, उमेद अभियानचे अधिकारी श्री. जितू गेडाम तसेच इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थीत होते.



## मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांची विविध संस्थाशी भागीदारीची घोषणा

ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या वतीने पुणे येथील आर्किड हॉटेल मध्ये दिनांक ४ ते ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळे मध्ये राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांना चालना देण्यासाठी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन यांनी ग्राम विकास आणि रोटरी इंटरनॅशनल व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थाशी भागीदारीची घोषणा केली.

याप्रसंगी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री. राजेश कुमार, मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, ग्राम विकास विभागाचे वरीष्ठ अधिकारी, राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त (विकास), उपायुक्त ( आस्थापना) , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व विविध संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.


रोटरी इंटरनॅशन संस्था ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या गरजू लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय्य करणार आहे. तर अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात इंटरशिपच्या माध्यमातून त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थांचा सहभाग देणार आहेत. तसेच ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांना कमी खर्चात चांगल्या घरकुल बांधकामाबाबत विकसीत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणार आहेत.



## मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती दलाची बैठक संपन्न

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या कामात गतीमानता आणण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६ मार्च, २०२३ रोजी राज्यस्तरीय कृतीदलाची बैठक मा. मुख्य सचिव यांचे दालन, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार व सदस्य सचिव,राज्यस्तरीय कृतीदल तथा संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांच्यासह राज्यस्तरीय कृतीदल समितीचे सदस्य उपस्थित होते. तसेच सर्व मा. विभागीय आयुक्त या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करूण देणे बाबतचे उद्दिष्ट, त्याकरीता येणाऱ्या अडचणी व त्याकरीता केलेल्या उपाय योजना तसेच इतर मार्गाने उपलब्ध असलेली जागा, जागेच्या अडचणी करीता राज्यात राबविलेले नावीन्यपूर्ण उपक्रम याबाबतचे सादरीकरण सदस्य सचिव, राज्यस्तरीय कृतीदल तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी केले. त्यानुसार भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या काम गतीमानतेने करण्याच्या सूचना मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांनी सर्व संबंधिताना दिल्या.




## मा. समाज कल्याण आयुक्त यांच्या हस्ते परभणी येथे घरकुल भुमिपूजन व गृहप्रवेश कार्यक्रम

दिनांक १२ फेब्रुवारी, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण आयुक्त श्री. प्रशांत नारनवरे यांच्या हस्ते व परभणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत परभणी तालुक्यातील धर्मापुरी या ग्रामपंचायतीमध्ये रमाई घरकुल आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा घरकुल गृहप्रवेश आणि गृहप्रवेश कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी सहाय्यक समाज कल्याण अधिकारी श्रीमती गीता गुट्टे, परभणी पंचायत समितीचे श्री. शिवाजीराव कांबळे, शाखा अभियंता श्री. वसेकर, श्री. शिंदे, श्री. सादिक, श्री. बोबडे, ग्रामविकास अधिकारी श्री. दुधाटे, ग्रामस्थ व घरकुल योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.



## जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जागा उपलब्धतेसाठी बुलढाणा येथे समन्वय बैठक

विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याकरिता दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. एच. पी. तुम्मोड यांचे अध्यक्षतेखाली ग्राम विकास व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची समन्वय बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी श्री. एच.पी. तुम्मोड यांनी अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी २२ ऑगस्ट, २०२२ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे, बहुमजली इमारतीची उभारणी सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना देणे व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करण्याचे सूचित केले.

या बैठकीला अपर जिल्हाधिकारी श्री. धनंजय गोगटे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.राजेश इंगळे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.



## घरकुल योजनांच्या कामात दिरंगाई केल्यास कारवाई होणार - जिल्हाधिकारी परभणी

दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी परभणी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे घेण्यात आली.

या बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भूमिहीन घरकुल लाभार्थीना गायरान जागा उपलब्धतेचे प्रस्ताव तहसीलदार यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अ, ब, क, ड फॉरमॅट मध्ये सादर करणे, पहिल्या हप्त्यांचे वितरण करून देय असणारे सर्व हप्ते त्वरित वितरित करणे, अपूर्ण घरकुले ३१ मार्च पर्यंत पूर्ण करणे, इ. बाबतीत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. तसेच घरकुल योजनांच्या कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी श्रीमती आचल गोयल यांनी सांगितले.



## घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना तहसिल कार्यालयातून वाळूचे वाटप

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ५ ब्रास मोफत वाळू देण्यात येते. तसेच बेकायदेशीर वाळू उपसा करणारे व वाळूची अवैद्य वाहतूक करणारे वाळू माफीय यांच्यावर दंडात्मक कारवाई व वाळू जप्ती महसूल विभागा मार्फत केली जाते. अशा प्रकारे जप्त होणारी वाळू तहसिल कार्यालयात ठेवण्यात येते किंवा बहुतांश ठिकाणी या जप्त केलेल्या वाळूची सॅण्ड बँक तयार करण्यात आली आहे. चंद्रपुर जिल्ह्यात तहसिल कार्यालयात जप्त केलेली वाळू घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी मोफत देवून सर्व जिल्ह्यांसाठी एक आदर्श उपक्रम दिला आहे.

यामध्ये दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वरोरा तहसील कार्यालयामध्ये जप्त केलेल्या १२० ब्रास वाळू साठ्यापैकी ११७ ब्रास वाळू वरोरा तालुक्यातील विविध आवास योजनांच्या गरजू लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी वाटप केली.

दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी सावली तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील गरजू लाभार्थ्यांना तहसील कार्यालय सावली मधील जप्त केलेली १६५ ब्रास वाळू घरकुल बांधकाम पूर्ण करण्याकरीता वाटप केली. यावेळी तहसिलदार श्री. पाटील, गट विकास अधिकारी श्री. तेलकापल्लिवार, नोडल अधिकारी श्री.मुरकुटे




# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट

## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी मोहिम

मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांचे अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ०४ व ०५ फेब्रुवारी, २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राज्यस्तरीय कार्यशाळा पुणे येथे संपन्न झाली. या कार्यशाळे मध्ये मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्णत्वाची गती अतिशय कमी असल्याबाबत तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त केले. या अनुषंगाने पुणे, कोकण, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ०३ मार्च, २०२३ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शानाखाली मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेकरीता पुणे व कोंकण (रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड) विभागाकरीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी उपसंचालक श्री. नीलेश काळे, राज्य समन्वयक (संनियंत्रण व मूल्यमापन) डॉ. संघरत्न सोनवणे यांच्यासह विभागीय प्रोग्रामर, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर पुणे येथे उपस्थित होते.



तसेच अमरावती व नागपूर विभागाकरीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले, राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव यांच्यासह विभागीय प्रोग्रामर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपुर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर अमरावती येथे उपस्थित होते.

त्याचप्रमाणे नाशिक व कोंकण (ठाणे व पालघर) विभागाकरीता राज्यस्तरीय संपर्क अधिकारी सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे, प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद) श्री. दिनेश मोवळे व राज्य समन्वयक (MIS) श्री.मायकल ऍल्डण यांच्यासह विभागीय प्रोग्रामर, नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, अहमदनगर, ठाणे व पालघर जिल्ह्यांचे जिल्हा प्रोग्रॅमर नाशिक येथे उपस्थित होते.






सदर मोहिमे अंतर्गत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, तसेच फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेण्यात आली. बांधकामाच्या टप्प्यानुसार घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले. अशा प्रकारची कार्यवाही या मोहिम कालावधीत करण्यात आली.

तसेच या मोहिम कालावधीत ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी यांना, त्यांना ठरवून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात आले. याकामी संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांनी आवश्यक ते सर्व सहकार्य केले.

या मोहिम कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अंतर्गत पुणे विभागात १,५८३, अमरावती विभागात ५,१७०, नागपूर विभागात ४,४२५५, नाशिक विभागात ४,५२० व कोंकण विभागात १,६९८ अशी एकुण १८,३३४ अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यात आली.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | ९६४८९ | ९६११६ | ८८०४० | ९१.६% | १ | १५१ |
| २ | नागपूर | ३७१५८ | ३७१४६ | ३०२०३ | ८१.३% | ८ | ४८९ |
| ३ | भंडारा | ६५१२० | ६५१०१ | ५१२७४ | ७८.८% | ११ | ४४० |
| ४ | गडचिरोली | ३१६८१ | ३१६०३ | २४८१५ | ७८.५% | १२ | ३३४ |
| ५ | वर्धा | १८६४५ | १८६२१ | १४३९१ | ७७.३% | १३ | ३७४ |
| ६ | चंद्रपूर | ४३१५९ | ४३०५७ | ३१८४९ | ७४.०% | १७ | ३११ |
| **नागपूर विभाग** | | २९२२५२ | २९१६४४ | २४०५७२ | ८२.५% | १ | |
| ७ | रायगड | ९८४२ | ९८३१ | ८८१२ | ८९.६% | २ | ३४९ |
| ८ | रत्नागिरी | ९९०७ | ९९०१ | ८३४२ | ८४.३% | ५ | १४८ |
| ९ | सिंधुदुर्ग | ५१४२ | ५१४२ | ४२३७ | ८२.४% | ६ | २२६ |
| १० | पालघर | ३५२३३ | ३५१८३ | २८४४५ | ८०.८% | ९ | २५१ |
| ११ | ठाणे | ९६०६ | ९५९९ | ७०७२ | ७३.७% | १८ | २८४ |
| **कोकण विभाग** | | ६९७३० | ६९६५६ | ५६९०८ | ८१.७% | २ | |
| १२ | नाशिक | ८९७१० | ८९६९५ | ७६९६७ | ८५.८% | ३ | २५९ |
| १३ | अहमदनगर | ६०७९५ | ६०७६९ | ५१४८३ | ८४.७% | ४ | ४०३ |
| १४ | नंदुरबार | ११९४४० | ११८९२३ | ९७६४२ | ८२.१% | ७ | ३७० |
| १५ | धुळे | ६४९५४ | ६४९०३ | ५१५१४ | ७९.४% | १० | ३२० |
| १६ | जळगाव | ७९७६४ | ७९४२८ | ५८०१७ | ७३.०% | २० | ५१९ |
| **नाशिक विभाग** | | ४१४६६३ | ४१३७१८ | ३३५६२३ | ८१.१% | ३ | |
| १७ | कोल्हापूर | १७७२७ | १७६८३ | १३३५३ | ७५.५% | १५ | २१८ |
| १८ | सातारा | १५३८६ | १५३७६ | ११४९० | ७४.७% | १६ | ३७१ |
| १९ | पुणे | २०५७७ | २०५३१ | १४४१३ | ७०.२% | २१ | ५६४ |
| २० | सांगली | २२१७६ | २२०२४ | १५१५४ | ६८.८% | २२ | ५०९ |
| २१ | सोलापूर | ४९६५५ | ४९४५२ | ३३४९१ | ६७.७% | २३ | ४९९ |
| **पुणे विभाग** | | १२५५२१ | १२५०६६ | ८७९०१ | ७०.३% | ४ | |
| २२ | अकोला | ४८७९७ | ४८७७८ | ३६९६३ | ७५.८% | १४ | ४९१ |
| २३ | अमरावती | ९५७०३ | ९५४९१ | ७००४३ | ७३.४% | १९ | ५१४ |
| २४ | यवतमाळ | ६५३६८ | ६५२२१ | ४३२०० | ६६.२% | २५ | ३१३ |
| २५ | बुलढाणा | ४४७६५ | ४४७२४ | २६३१९ | ५८.८% | २८ | ३९३ |
| २६ | वाशिम | २०४१२ | २०३९४ | १०९३३ | ५३.६% | ३२ | ३७५ |
| **अमरावती विभाग** | | २७५०४५ | २७४६०८ | १८७४५८ | ६८.३% | ५ | |
| २७ | औरंगाबाद | ३६७९५ | ३६६३६ | २४७१७ | ६७.५% | २४ | २६७ |
| २८ | हिंगोली | १८१०८ | १८०८३ | ११४४७ | ६३.३% | २६ | २०१ |
| २९ | जालना | २४०३९ | २४०३३ | १४३४९ | ५९.७% | २७ | ३१९ |
| ३० | नांदेड | ६९५४८ | ६९४६० | ४०३३० | ५८.१% | २९ | ५१२ |
| ३१ | बीड | ३५३१९ | ३५२५६ | २००४८ | ५६.९% | ३० | ३४८ |
| ३२ | लातूर | २०७१८ | २०५६२ | ११३८६ | ५५.४% | ३१ | ४४६ |
| ३३ | उस्मानाबाद | १४५१६ | १४३६४ | ६८९३ | ४८.०% | ३३ | ४२६ |
| ३४ | परभणी | १९१०२ | १९०६३ | ८६०७ | ४५.२% | ३४ | २२३ |
| **औरंगाबाद विभाग** | | २३८१४५ | २३७४५७ | १३७७७७ | ५८.०% | ६ | |
| **एकूण** | | १४१५३५६ | १४१२१४९ | १०४६२३९ | ७४.१% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ६६८४ | ६३५० | ५६७० | ८९.३% | २ |
| २ | सिंधुदुर्ग | २०३१ | २०२९ | १७९१ | ८८.३% | ४ |
| ३ | रायगड | २०३९ | २०२९ | १७०१ | ८३.८% | ७ |
| ४ | पालघर | ४९८ | ४५८ | ३७२ | ८१.२% | १० |
| ५ | ठाणे | १२५६ | १२२७ | ९१५ | ७४.६% | २० |
| | कोकण विभाग | १२५०८ | १२०९३ | १०४४९ | ८६.४% | १ |
| ६ | सातारा | १०३२८ | १०३१८ | ९३०४ | ९०.२% | १ |
| ७ | कोल्हापूर | १२४४३ | १२४४३ | १०४८० | ८४.२% | ६ |
| ८ | सोलापूर | १७६८९ | १७५९९ | १४०९९ | ८०.१% | ११ |
| ९ | सांगली | ८६१४ | ८५२४ | ६७७२ | ७९.४% | १३ |
| १० | पुणे | ९५१७ | ९४६० | ७३८३ | ७८.०% | १५ |
| | पुणे विभाग | ५८५९१ | ५८३४४ | ४८०३८ | ८२.३% | २ |
| ११ | नागपूर | ८०३९ | ७९४३ | ६७३३ | ८४.८% | ५ |
| १२ | भंडारा | १२४८० | १०७०० | ८९४७ | ८३.६% | ८ |
| १३ | गोंदिया | १०१२७ | ९३८९ | ७७५८ | ८२.६% | ९ |
| १४ | वर्धा | ७५०९ | ७५०३ | ५९६५ | ७९.५% | १२ |
| १५ | चंद्रपूर | २२८७३ | १६८६९ | १३३०८ | ७८.९% | १४ |
| १६ | गडचिरोली | ६८८० | ६६४५ | ५०७२ | ७६.३% | १८ |
| | नागपूर विभाग | ६७९०८ | ५९०४९ | ४७७८३ | ८०.९% | ३ |
| १७ | अहमदनगर | २८४३४ | २८४०५ | २५१४४ | ८८.५% | ३ |
| १८ | नाशिक | १२३३८ | ११९८० | ८६८१ | ७७.६% | १६ |
| १९ | जळगाव | १६७५८ | १६६७१ | १२२८९ | ७३.७% | २१ |
| २० | धुळे | ८५४९ | ८४६९ | ५६०८ | ६६.२% | २६ |
| २१ | नंदुरबार | ३५२२ | ३४१६ | २१९६ | ६४.३% | २८ |
| | नाशिक विभाग | ६९६०१ | ६८९४१ | ५३९१८ | ७९.१% | ४ |
| २२ | यवतमाळ | १४३४१ | १४३४४ | १०९९९ | ७६.७% | १७ |
| २३ | वाशिम | ९१६६ | ९१६४ | ६३३१ | ६९.१% | २२ |
| २४ | अकोला | १८०९२ | १५९७० | १०८२८ | ६७.८% | २४ |
| २५ | अमरावती | १४९३७ | १४६०१ | ९८०७ | ६७.२% | २५ |
| २६ | बुलढाणा | १८५५४ | १८४५७ | १२०६० | ६५.३% | २७ |
| | अमरावती विभाग | ७५०९० | ७२५३६ | ५००२५ | ६९.०% | ५ |
| २७ | परभणी | १६८४१ | १६५६५ | १२४८७ | ७५.४% | १९ |
| २८ | लातूर | २६२४२ | २५४०५ | १७३६२ | ६८.३% | २३ |
| २९ | उस्मानाबाद | २३६६४ | १६०८० | १००८२ | ६२.७% | २९ |
| ३० | औरंगाबाद | २२२३३ | २१२४१ | १२७२३ | ५९.९% | ३० |
| ३१ | नांदेड | २१३०० | १८७७१ | १०७१० | ५७.१% | ३१ |
| ३२ | बीड | २५७३५ | २४१३५ | १३६९५ | ५६.७% | ३२ |
| ३३ | जालना | १९२४६ | १८५८२ | १०३८८ | ५५.९% | ३३ |
| ३४ | हिंगोली | १४२२८ | ११८५५ | ६३८५ | ५३.९% | ३४ |
| | औरंगाबाद विभाग | १६९४८९ | १५२६३४ | ९३८३२ | ६१.५% | ६ |
| | एकूण | ४५३१८७ | ४२२७९७ | ३०४०४५ | ७१.९% | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | १९४५६ | १०९२७ | ९७९६ | ८९.६% | ५ |
| २ | जळगाव | ८३३१ | ५२८९ | ४६३० | ८७.५% | ७ |
| ३ | अहमदनगर | ६६४६ | ४३४८ | ३६८९ | ८४.८% | ९ |
| ४ | धुळे | १२८०९ | ८४०९ | ६९१३ | ८२.२% | १२ |
| ५ | नंदुरबार | २३०४६ | १०७१९ | ८१४० | ७५.९% | २१ |
| नाशिक विभाग | | ७०२८८ | ३९६९२ | ३३१६८ | ८३.६% | १ |
| ६ | हिंगोली | १३०३५ | ३१९५ | २८७३ | ८९.९% | ४ |
| ७ | नांदेड | ४९९१ | १०५७ | ८८७ | ८३.९% | ११ |
| ८ | औरंगाबाद | ३८५१ | २५०३ | २०५० | ८१.९% | १३ |
| ९ | जालना | ११६२ | ५२० | ४२५ | ८१.७% | १४ |
| १० | परभणी | २८८७ | ८२१ | ६३१ | ७६.९% | २० |
| ११ | बीड | १०५१ | ५४६ | ४०२ | ७३.६% | २५ |
| १२ | लातूर | ९०२ | ५९८ | ४२३ | ७०.७% | २७ |
| १३ | उस्मानाबाद | ४२४ | २८४ | १८३ | ६४.४% | ३१ |
| औरंगाबाद विभाग | | २८३०३ | ९५२४ | ७८७४ | ८२.७% | २ |
| १४ | कोल्हापूर | ५० | १३ | १३ | १००.०% | १ |
| १५ | सोलापूर | ७९४ | ६२६ | ५६६ | ९०.४% | ३ |
| १६ | सांगली | ८० | ५० | ४२ | ८४.०% | १० |
| १७ | पुणे | ४८७२ | ३०६४ | २४१२ | ७८.७% | १८ |
| १८ | सातारा | १८७ | १८३ | १३८ | ७५.४% | २३ |
| पुणे विभाग | | ५९८३ | ३९३६ | ३१७१ | ८०.६% | ३ |
| 19 | बुलढाणा | २६९१ | ११३६ | ९०९ | ८०.०% | १६ |
| 20 | अमरावती | ७३२९ | ४३२८ | ३४२४ | ७९.१% | १७ |
| 21 | अकोला | ५२१५ | १३४३ | ९६० | ७१.५% | २६ |
| 22 | यवतमाळ | ९८२२ | ६६९४ | ४५१८ | ६७.५% | २९ |
| 23 | वाशिम | २२७० | ८२२ | ५४५ | ६६.३% | ३० |
| अमरावती विभाग | | २७३२७ | १४३२३ | १०३५६ | ७२.३% | ४ |
| २४ | चंद्रपूर | १४५१६ | ५८८५ | ४७९७ | ८१.५% | १५ |
| 25 | नागपूर | ८१८८ | २८६८ | २२५३ | ७८.६% | १९ |
| २६ | वर्धा | ५१९२ | ३३८२ | २५६२ | ७५.८% | २२ |
| 27 | भंडारा | ५११० | ४४८६ | ३३४५ | ७४.६% | २४ |
| २८ | गोंदिया | ४०९९ | ३२७९ | २०१९ | ६१.६% | ३३ |
| 29 | गडचिरोली | ८१७६ | ६७८५ | ४१२६ | ६०.८% | ३४ |
| नागपूर विभाग | | ४५२८१ | २६६८५ | १९१०२ | ७१.६% | ५ |
| ३० | रत्नागिरी | ३३८ | २४५ | २२३ | ९१.०% | २ |
| ३१ | ठाणे | ३४३० | १९४५ | १७३४ | ८९.२% | ६ |
| ३२ | सिंधुदुर्ग | ४३ | २७ | २३ | ८५.२% | ८ |
| ३३ | पालघर | १०१६३ | ८९९८ | ६०८० | ६७.६% | २८ |
| ३४ | रायगड | ३९७१ | २७९७ | १७४८ | ६२.५% | ३२ |
| कोकण विभाग | | १७९४५ | १४०१२ | ९८०८ | ७०.०% | ६ |
| एकूण | | १९५१२७ | १०८१७२ | ८३४७९ | ७७.२% | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ५० | ५० | ४८ | ९६.०% | १० |
| २ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.५% | १६ |
| ३ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५% | १७ |
| नागपूर विभाग | | १३३ | ११७ | १०७ | ९१.५% | १ |
| 4 | धुळे | ४३२ | ४३२ | ४१७ | ९६.५% | ८ |
| 5 | अहमदनगर | १९८ | १९८ | १८२ | ९१.९% | १३ |
| 6 | जळगाव | ५७० | ५६६ | ४७९ | ८४.६% | १८ |
| 7 | नाशिक | १४३ | १३७ | ९९ | ७२.३% | २४ |
| 8 | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०% | २९ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १३३३ | ११७७ | ८८.३% | २ |
| ९ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९% | ७ |
| १० | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५२ | ९४.९% | ११ |
| ११ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१० | ९२.३% | १२ |
| १२ | अकोला | ३७४ | ३७३ | ३३७ | ९०.३% | १५ |
| १३ | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४४६ | ७५.२% | २२ |
| अमरावती विभाग | | १८५४ | १८४५ | १६०७ | ८७.१% | ३ |
| १४ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १५ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| १६ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १७ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १८ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७% | १४ |
| १९ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | २०१ | ८१.४% | १९ |
| २० | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४१ | ८०.४% | २१ |
| २१ | जालना | ३८ | ३४ | २५ | ७३.५% | २३ |
| औरंगाबाद विभाग | | ५९२ | ५६४ | ४९१ | ८७.१% | ४ |
| २२ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.०% | २ |
| २३ | सातारा | २४ | २४ | २४ | १००.०% | ६ |
| २४ | सोलापूर | २३१ | २०२ | १९४ | ९६.०% | ९ |
| २५ | सांगली | ३८ | २६ | २१ | ८०.८% | २० |
| २६ | पुणे | १८८ | १७४ | १२२ | ७०.१% | २५ |
| पुणे विभाग | | ४८८ | ४३३ | ३६८ | ८५.०% | ५ |
| | एकूण | ४४२० | ४२९२ | ३७५० | ८७.४% | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ४८ | ९६.०% | १ |
| २ | रायगड | १३९४ | १३९४ | १११६ | ८०.१% | २ |
| ३ | रत्नागिरी | ८ | ८ | ६ | ७५.०% | ४ |
| ४ | पालघर | ११३१ | ११२८ | ८०० | ७०.९% | ५ |
| ५ | ठाणे | १५७८ | १५६२ | १०४२ | ६६.७% | ७ |
| कोकण विभाग | | ४१७७ | ४१४२ | ३०१२ | ७२.७% | १ |
| ६ | गडचिरोली | १७७८ | १७२१ | १३७५ | ७९.९% | ३ |
| ७ | चंद्रपूर | ७२३ | ५०२ | ३११ | ६२.०% | ८ |
| ८ | वर्धा | ३९६ | २३५ | ४७ | २०.०% | १२ |
| नागपूर विभाग | | २८९७ | २४५८ | १७३३ | ७०.५% | २ |
| ९ | नांदेड | ४१९ | १८१ | १२१ | ६६.९% | ६ |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८१ | १२१ | ६६.९% | ३ |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४२१३ | १५९२ | ३७.८% | ९ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | ४२१३ | १५९२ | ३७.८% | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | १२ | ३२.४% | १० |
| नाशिक विभाग | | ९८ | ३७ | १२ | ३२.४% | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | १५ | २१.१% | ११ |
| पुणे विभाग | | ७५ | ७१ | १५ | २१.१% | ६ |
| एकूण | | १२४५० | ११००२ | ६४८५ | ५८.४% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च, २०२३

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००.०% | १ |
| २ | चंद्रपूर | २१३८ | ० | ० | ०.०% | ११ |
| ३ | नागपूर | १६ | ८ | ० | ०.०% | १२ |
| नागपूर विभाग | | २१७४ | २८ | २० | ७१.४% | १ |
| ४ | लातूर | १० | १० | १० | १००.०% | २ |
| ५ | उस्मानाबाद | ५१८ | ३५७ | २११ | ५९.१% | ४ |
| औरंगाबाद विभाग | | ५२८ | ३६७ | २२१ | ६०.२% | २ |
| ६ | सोलापूर | ४ | ४ | ३ | ७५.०% | ३ |
| ७ | सातारा | १०८ | १०८ | ४४ | ४०.७% | ५ |
| ८ | कोल्हापूर | ६५ | ६५ | २३ | ३५.४% | ६ |
| ९ | पुणे | २० | ० | ० | | १३ |
| पुणे विभाग | | १९७ | १७७ | ७० | ३९.५% | ३ |
| १० | रत्नागिरी | ९५ | ७४ | २१ | २८.४% | ८ |
| कोकण विभाग | | ९५ | ७४ | २१ | २८.४% | ४ |
| ११ | अमरावती | ५०७ | २२० | ७१ | ३२.३% | ७ |
| १२ | यवतमाळ | १४० | १३९ | २३ | १६.५% | ९ |
| अमरावती विभाग | | ६४७ | ३५९ | ९४ | २६.२% | 5 |
| १३ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.०% | १० |
| नाशिक विभाग | | २० | २० | ० | ०.०% | ६ |
| एकूण | | ३६६१ | १०२५ | ४२६ | ४१.६% | |

# शासकीय यंत्रणेच्या सहकार्यामुळे वारसाला घरकुलाचा लाभ

स्वतःच्या मालकीचं एक पक्क व सुंदर घर असावं हे प्रत्येक माणसाचं स्वप्न असतं आणि ते पूर्ण करण्यासाठी तो नेहमीच प्रयत्नशिल असतो. असेच काही स्वप्न नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यामधील चिखली ग्रामपंचायतीचे श्री. राजेंद्र डोमाजी पिंपळकर यांचेही होते. परंतु आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यास अनेक अडचणी येत होत्या. त्यातचं त्यांचे घर हे मोडकळीस आले असल्याने पावसाळ्यात छतातून पाणी गळती, त्यामुळे बहुतांश वेळा रात्र जागून काढावी लागत होती. घराची इतकी वाईट परिस्थिती झाली होती की, घर पडण्याची कायम मनामध्ये भीती होती. पडक्या घरामुळे गावात व समाजात पिंपळकर कुटुंबियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला होता. कित्येकदा तर त्यांना मानहानी सहन करावी लागत असे, दिवसेंदिवस त्यांचा आत्मविश्वास खचत चाललेला होता. श्री. राजेंद्र डोमाजी पिंपळकर यांचे आता फक्त स्वतःचे पक्के घर बांधणे हेच एक स्वप्न होते.

घरकुलाच्या प्रतिक्षेत असलेले श्री. राजेंद्र डोमाजी पिंपळकर यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये घरकुल मंजूर होताच त्यांना गृहस्वप्नपूर्तीचे संकेत दिसू लागले. पण नियतीला हे मान्य नव्हते आणि श्री. राजेंद्र डोमाजी पिंपळकर यांचा अकस्मात मृत्यु झाला. या दुःखद घटनेमुळे त्यांच्या पत्नी श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर व त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगरचं उभा राहिला. त्यांच्या परिवारावर आलेल्या या भल्यामोठ्या संकटामुळे त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण होईल की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर पूर्णतः खचून गेल्याने त्यांनी घराची आशाच सोडली होती.

अशातच भिवापूर पंचायत समितीचे अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांच्या घरी आले. त्यांनी त्यांचे सांत्वन केले व त्यांना धिर देत त्यांच्या नावाचा घरकुलाचा प्रस्ताव ग्रामपंचायत कार्यालयामार्फत पंचायत समितीला सादर करण्याचा सल्ला दिला. याकामी ग्रामपंचायतीने विनाविलंब प्रस्ताव तयार करून पंचायत समितीकडे सादर केला. त्यांनी सर्व खातरजमा करून श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांचे नावे घरकुल मंजूर केले. त्यांच्या पतीची अपूर्ण इच्छा पूर्ण होणार हे कळताच त्यांना व त्यांच्या परिवाराला आनंद झाला.



घरचा कर्ता पुरूष गेल्याने श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांचेवर घरकुल पूर्ण करण्याची जबाबदारी आली. त्यातच त्यांना घर बांधण्याचा कोणताही अनुभव नसल्याने नवीन अडचण निर्माण झाली. या विषयी त्यांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयातील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचेशी संपर्क साधला. त्यामुळे श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांना घरकुल बांधकमात सर्व स्तरावरील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांची वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शनासह आवश्यक ती सर्व मदत व प्रोत्साहन मिळाले. स्वतःला सावरून त्यांनी घराचे बांधकाम सुरु केले.

घरकुल मंजूर होताच पंचायत समिती कार्यालयाने श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांच्या बँक खाती पहिल्या हप्त्याची रक्कम रू. १५,०००/- तात्काळ जमा केली. तसेच पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर लेआउट देवून बांधकाम मजुरांना आवश्यक त्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे वेळोवेळी पंचायत समितीचे अधिकारी घरकुल बांधकामाला भेट देवून मार्गदर्शन व बांधकामाच्या टप्प्यानुसार घरकुलाचे हप्ते वितरीत केले. ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व पदाधिकारी यांच्या सहकार्यामुळे श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांनी पक्क्या व सुंदर घराचे बांधकाम पूर्ण केले.

पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी घराचे बांधकामाला भेट देवून आनंद व्यक्त केला. तसेच शौचालय बांधकाम करण्यास प्रोत्साहीत केले. याकरीता त्यांनी श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांना शौचालयाचे महत्व पटवून देवून ते आरोग्यासाठी किती आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांचे सूचनेला मान देवून शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले. त्यामुळे श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांना शेवटचा हप्ता रक्कम रु. २०,०००/- त्यांच्या बँक खाती जमा झाला. अशाप्रकारे त्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलासाठी एकुण रक्कम रु. १,२०,०००/- अर्थसहाय्य शासनाकडून मिळाले.

आज माझ्या पतीचे स्वतःचे घराचे स्वप्न पूर्ण झाले असून यामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे. प्रशासनाच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले. याकरीता मला सर्वांनी मदत केली, वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल मी सर्वांची ऋणी असल्याची प्रतिक्रीया श्रीमती कविता राजेंद्र पिंपळकर यांनी व्यक्त केली.



# महा आवास अभियान-ग्रामीण मुळे मिळाला सुरक्षित निवारा

अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा असून त्या पूर्ण करण्यासाठी तो नेहमीच प्रयत्नशिल असतो. त्यामध्येच निवारा हा माणसाच्या जीवाभावाचा व प्रतिष्ठेचा विषय असून तो पूर्ण करण्यासाठी माणूस सातत्याने धडपड असतो. ग्रामीण भागातील गरीब, बेघर, भूमिहीन व गरजू लोकांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे व सर्वांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजना राज्यात राबविण्यात येत असून यामुळे लाखो लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळत आहे. या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी रक्कम रु.१,२०,०००/- इतके अनुदान देय असून यासोबतच शासकीय योजनांच्या कृती संगमातून इतर शासकीय योजनांचाही लाभ देण्यात येतो.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात सन २०२०-२१ मध्ये महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. या अभियान कालावधीत लाखो लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला. यामध्ये पुसला गावातील घरकुल लाभार्थी श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांचाही समावेश होता. पुसला हे गाव पंचायत समिती वरुड येथून साधारणता २५ कि.मी अंतरावर असून गावची साधारणतः लोकसंख्या २०,००० इतकी आहे. श्रीमती सावित्री देविदास बोरीवर या इतर मागास वर्गातील असून त्यांच्या पतीचे हृदय विकाराने निधन झाले आहे. सद्या त्या एक मुलगा व एक मुलगी यांच्या समवेत राहत असून हात मजुरी करून त्यांचा उदरनिर्वाह सूरू आहे. हात मजुरीतून मिळणाऱ्या पैशातून त्या फक्त घरच्या अन्न, वस्त्र व मुलांचे शिक्षण इतक्याच गरजा पूर्ण होत होत्या. परंतु मुख्य निवाऱ्याची गरजेचे स्वप्न मात्र पूर्ण होवू शकत नव्हते. अशातच पतीचे निधन झाल्याने आपले कधी घर होईल आशाच संपली होती. श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांचे जुने घर कुडा मातीचे असल्यामुळे पावसाळ्यात छत गळणे, भिंतीची माती कोसळणे व वाऱ्याने छत उडणे अशा अडचणींशी नेहमीच सामना करावा लागत होता. अशा परिस्थिती कोही जीवीत हाणी होण्याची कायम मनात भीती राहायची.

अशातच एक दिवस महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयात घरकुल विषयी कार्यशाळेला असल्याचे श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांना कळताच त्या घरकुलच्या कार्यशाळेला गेल्या. ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या कार्यशाळेमध्ये श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाल्याचे समजले. अभियान कालावधी असल्याने घरकुल मंजूरी नंतर विनाविलंब माझ्या बँक खाती घरकुलाचा पहिला हप्ता रक्कम रु. १५,०००/- खात्यावर जमा करण्यात आला. यातूनच त्यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली. त्यांचे घरकुल बांधकाम सुरु असताना त्यांना घरकुल बांधकाम जोत्या पर्यंत पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या बँक खात्यावर दुसरा हप्ता रक्कम रु.४५,०००/- जमा करण्यात आला. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्राम रोजगार सेवक व इतर ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या मदतीने श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांचे घराचे काम पूर्ण हाताच त्यांच्या बँक खाती तीसरा हप्ता रक्कम रू. ४०,०००/- जमा करण्यात आले. तसेच शौचालय बांधकाम पूर्ण केल्यावर शेवटच्या हप्त्याची रक्कम देण्यात असे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी सांगितले. श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांनी शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण केल्यावर ग्रामपंचायत कर्मचारी यांनी घराची मोजणी करून गाव नमून ८ अ नोंद घरकुलाची नोंद घेतली. तसेच शेवटचा हप्ता रक्कम रू. २०,०००/- श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला. त्यासोबतच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मनुष्य दिवसाचे देयकही मिळाले.

पती गेल्यानंतर उभ्या आयुष्यात आपण घर बांधू शकणार नाही अशी धारणा झाली असतांना शासनाच्या महा आवास अभियानामुळे मला हक्काचा निवार मिळाला असून मी व माझे कुटुंब अत्यंत आनंदी असल्याची प्रतिक्रीया श्रीमती सावित्री देविदास बोरीवर यांनी व्यक्त केली.





# हक्काच्या पक्क्या घरकुलासह इतर शासकीय योजनांचाही लाभ

चिंचाळा (उ.प.) ग्रामपंचायत तालुका उमरी व जिल्हा नांदेड अंतर्गत येत असून येथील रहिवाशी श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२१-२२ या वर्षात घरकुल मंजुर झालेले आहे. यापुर्वी ते अत्यंत जीर्ण अवस्थेत असलेल्या माती व पत्राच्या घरात राहात होते. त्यांना परिवाराच्या सुरक्षितेसाठी त्यांना कोणत्याही परिस्थितीत पक्के घर बांधणे गरजेचे झाले होते. याकरीता ते सातत्याने प्रयत्न करत होते. अशातच त्यांना ग्रामीण गृहनिर्माण योजनांबद्दल माहिती मिळाली. या घरकुल योजनाबद्दल अधिक सविस्तर माहिती घेण्यासाठी त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधला व घरकुल योजना विषयी चौकशी केली. त्यावेळी त्यांना कळले की, त्यांचे नाव प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण प्रतिक्षा यादी असून सन २०२०-२१ मध्ये त्यांना घरकुल मंजुर झाले आहे. हे कळताच श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांना अत्यंत आनंद झाला.

श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांना घरकुल मंजूर झाल्यानंतर करायची कार्यवाही व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत ग्रामसेवक श्री. उशोल यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच त्यांचा परिपुर्ण प्रस्ताव तयार करून पंचायत समिती कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केला. प्रस्ताव सादर केल्यानंतर पंचायत समितीचे ऑपरेटर श्री. बालाजी कदम यांनी माझा प्रस्ताव घेउन त्यांनी नोंदणी केली आणि माझे खाते नंबर,आधार कार्ड घेउन आधार शेडींग केली. तसेच पंचायत समिती उमरीचे सहाय्यक लेखाधिकारी श्री. भुसारे यांनी पहिला हप्ता रक्कम रू.१५,०००/- तात्काळ श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांच्या बँक खाती जमा केले. यानंतर त्यांनी पाया खोदकाम करत घरकुल बांधकामास सुरूवात केली. घरकुल बांधकाम सुरूवात केल्यानंतर त्यांना ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवळी मार्गदर्शन केले. ग्रामरोजगार सेवक यांनी त्यांना महात्मा गांधी रोजगार हमी योजने मधुन त्यांच्या घरकुल बांधकामासाठी असलेल्या चार मजुराच्या बँक खाती एकुण रक्कम रूय १८,०००/- इतके जमा केले. त्यामुळे त्यांना चांगल्या दर्जाचे घरकुल बांधकाम करण्यास फार मोठी मदत झाली.

श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांच्या घरकुलाचे बांधकाम सुरू असताना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी नियमीत भेटी देऊन त्यांना घरकुल बांधकामा विषयी व घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार देय अर्तसहाय्य याबाबत योग्य मार्गदर्शन केले. पंचायत समिती उमरीचे गट विकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थ्यांची बैठक घेवून घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करण्याचे सूचित केले. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना हप्ते मिळण्यास कोणताही विलंब लागला नाही. श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांना घरकुलाचे सर्व हप्ते वेळेवर मिळाल्याने त्यांनी घराचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण केले. त्यामुळे त्यांनी बांधलेल्या घरकुलाची चर्चा सर्वत्र होऊ लागली. त्यांच्या घरकुलाला तालुकास्तरावरून गट विकास अधिकारी व जिल्हास्तरावरून कनिष्ठ अभियंता, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी भेट देवून श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांचे कौतुक केले.

श्री.बालाजी जळबा कोरनेलू यांना घरकुलासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून एकुण रक्कम रू.१,२०,०००/-, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून शौचालयासाठी रक्कम रू. १२,०००/- व मनरेगा मधून रक्कम रू. १८,०००/- इतके अनुदान मिळाले. यामुळे त्यांना घरकुल बांधकामास भरपूर आर्थिक मदत झाली.

माझे घरकुल पुर्ण झाल्यामुळे मी आता खुप समाधानी आहे. पावसाळयामध्ये वारा वादळ सुटल्यास आला मला छत उडण्याची भिती वाटत नाही. तसेच मला प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस कनेक्शन, सौभाग्य योजने मधून लाईट जोडणी, ग्रामपंचायत कार्यालयाकडून पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी मिळाली. शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणमुळे मला पक्के घर मिळाल्याने मी व माझे कुटुंब आज अत्यंत आनंदी आहे. याकामी मला सहकार्य केले त्यांच्या सर्वांचा मी ऋुणी आहे.





# अहमदनगर जिल्ह्यात २१ दिवसांच्या विक्रमी कालावधीत घरकुल बांधकाम पूर्ण

शेवगाव तालुक्याच्या पूर्वेला २२ किलोमीटर अंतरावर काशी नदीच्या तीरावर वसलेले चेडेचांदगाव हे वसलेले असून या गावची अंदाजे लोकसंख्या १७०० इतकी आहे. या गावामध्ये विविध जाती, धर्म व सांप्रदायाचे लोक गुण्यागोविंदाने व एक जुटीने राहात असल्याची ख्याती संपूर्ण पंचकृषीत आहे. शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून व ग्राम विकास कामांच्या माध्यमातून गावची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरू आहे.

गावातील पक्क्या घरापासून वंचित असलेल्या व बेघर कुटुंबाना शासनाच्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, पारधी आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, इ. योजनांच्या माध्यमातून गावात घरकुलाचा लाभ दिला आहे. गावातील बहुतांश लाभार्थ्यांची घरकुले पुर्ण झाली असून अंतिम टप्प्यात असलेली घरकुलांची बांधकामे लवकर पूर्ण करून आवास योजनांची कामे १०० टक्के पूर्ण करण्याचा गावाने प्रण केला आहे. ग्रामपंचायतीमध्ये पहिल्यांदाच थेट लोकांमधून निवडलेल्या महिला सरपंचासह गावातील तीन प्रभागातून निवडलेले ७ ग्रामपंचायत सदस्य गावचा कारभार सक्षमपणे पाहत असल्याने गाव तालुक्यात व जिल्ह्यात नावारूपास आले आहे.

विविध आवास योजनांमधून लाभार्थ्यांना पक्के घरकुल मिळाल्याने गावातील अनेक कुटुंब सुखी समाधानी झाले. काही प्रातिनिधिक उदाहरणे द्यावयाची झाल्यास श्री.मनोहर तुकाराम चेडे यांचे पक्के घर नसल्याने पावसाळ्यात छपरातून टिप टिप पाणी गळतीमुळे घरात झोपायला तर सोडाच पण बसायला सुद्धा जागा कोरडी सापडत नव्हती. त्यामुळे पाऊस सुरू झाला की, घरातील सर्व मंडळी छतातून गळणारे पाणी साठवण्यासाठी व घरातील जमीन कोरडी ठेवण्यासाठी छतातून गळतीच्या ठिकाणी भांडीकुंडी ठेवण्याच्या कामात व्यस्त राहायची. तसे पहायला गेले तर घराला भिंती म्हणून फक्त विटांचा आडोसा होता. या विटा पडण्याची व विटांमध्ये विषारी जीवजंतू लपून बसण्याची कायम मनात भिती राहायची. त्यामुळे त्यांना घरकुलांचे बांधकाम तात्काळ सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करणे गरजेचे होते. हाच विचार मनी धरून दिनांक २७/१२/२०२२ रोजी उप अभियंता शेवगाव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.मनोहर तुकाराम चेडे यांनी घरकुलाचे बांधकाम सुरु केले व १७/०१/२०२२ रोजी काम पूर्ण झाले. अवघ्या २१ दिवसांच्या विक्रमी कालावधीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केल्याने श्री. मनोहर तुकाराम चेडे यांचेवर सर्व स्तरावरून कौतुकाचा वर्षाव होतो आहे.

त्याचप्रमाणे श्री. सयाजी दिनकर रंधवे यांची परिस्थिती हलाखीची असल्याने राहायला घर तर सोडाच पण घर बांधायला स्वतःची जागाही नव्हती. गावात घरदार नसल्याने लग्नाचे वय झालेल्या दोन्ही उपवर मुलींचे लग्न जुळवणे कठीण झाले होते. श्री. सयाजी दिनकर रंधवे यांची समस्या समजून घेत ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून दिली. एवढेच नाहीतर त्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी त्यांना घरकुल बांधकामात सर्वोत्तोपरी मदत केली. त्यामुळे श्री. सयाजी दिनकर रंधवे यांनी रमाई आवास योजनेतून पक्क्या घरकुलाचे बांधकाम अत्यल्प कालावधीत पूर्ण केले. पक्क्या घरात रहायला गेल्यानंतर समाजात व गावात त्यांची प्रतिष्ठा वाढली. बघता बघता मुलींची चांगल्या घरात लग्नही झालीत. त्यांना मिळालेल्या पक्का घरकुलासाठी श्री. सयाजी दिनकर रंधवे यांनी ग्रामपंचायत व शासनाचे खुप खुप आभार मानले आहे.

गावातील प्रत्येक घटकातील, विविध स्तरातील लोकांना शासनाच्या विविध विभागातील योजनांच्या माध्यमातून न्याय देण्यात चेडेचांदगाव ग्रामपंचायत अग्रेसर असून इतर गावांसाठी मार्गदर्शक ठरेल असे विकासाचे मॉडेल म्हणून उभे राहत आहे. त्यासाठी नागरिक व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी धडपड करत आहेत आणि सदैव करणार असल्याची प्रतिक्रीया सरपंच श्रीमती कोमल भाऊसाहेब कणसे यांनी व्यक्त केली.





# दिव्यांग मुलासाठी वडिलांनी बांधले अवघ्या ३५ दिवसात घरकुल

तळे हिप्परगा या गावचे श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे हे रहिवासी असून हे गाव सोलापूर जिल्हा व तालुक्यामध्ये आहे. श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे हे दिव्यांग असून त्याचा सांभाळ त्यांचे वडील करतात. ते त्यांच्या संपूर्ण परिवारासह पत्रा शेडच्या घरात राहत होते. यापुर्वी त्यांच्या वडीलांचे घर राहण्यायोग्य नसतांनाही पत्र्याच्या शेड मध्ये कसेबसे कुटूंबासह वास्तव्य करत होते. रहायला स्वतःचे पक्के घर नव्हते व परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने मोल मजूरीचे काम करुन त्यांचा व त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह त्यांचे वडील करत होते. पक्के घर नसल्याने पावसाळयात छत गळतीचा तर उन्हळ्यात पत्र्याच्या घरामुळे गरमीचा त्रास होत होता. अशा अत्यंत हलाखीच्या व वाईट परिस्थितीत त्यांचे कुटुंब जीवन जगत होते. परंतु आपण गेल्यावर आपल्या दिव्यांग मुलाची चिंता व त्याला सुरक्षित निवार देण्यासाठी श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांचे वडील अहोरात्र प्रयत्न करत होते.

अशातच श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांच्या वडीलांना रमाई आवास योजने बाबत कळले. त्यांच्या वडीलांनी थोडाही विलंब न करता ग्रामपंचायत कार्यालयात आपली व्यथा मांडून आपल्या दिव्यांग मुलासाठी घरकुलाची मागणी केली. ग्रामपंचायत कार्यालयाने त्यांच्या विनंतीवरून परीपूर्ण प्रस्ताव तयार करून पंचायत समिती कार्यालयास सादर केला. त्यानुसार रमाई आवास योजनेतून पंचायत समिती, उत्तर सोलापूर कडून श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांना घरकुल मंजूर करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या वडीलांना आपल्या दिव्यांग मुलाला हक्काचे पक्के घरकुल मिळणार अशी आशा दिसू लागली.

शासनाच्या ग्राम विकास व पंचायत राज विभागा मार्फत सन २०२०-२१ या वर्षात राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत असल्याने श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांच्या वडीलांना लवकर घरकुल पूर्ण करणेबाबत पंचायत समिती कडून सांगण्यात आले. रमाई आवास योजने मधून घरकुल मंजूर होताच पहिला हप्ता रक्कम रू. १५,०००/- त्यांच्या बँक खाती जमा करताच त्यांनी घरकुल बांधकामासा सुरूवात केली. त्यांच्या घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांना सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करण्यात आले. दिव्यांग मुलासाठी बापाची तळमळ पाहुन ग्रामस्थ व शासकीय यंत्रणेने घरकुल बांधकामास सर्वोत्तोपरी सहकार्य केले. त्यामुळे श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांच्यासाठी त्यांच्या वडीलांनी अवघ्या ३५ दिवसात घरकुल पुर्ण केले. पत्र्याच्या शेड मुक्त चार भिंतीचे त्यांच्या कुटुंबाचे स्वतःच्या घराचे स्वप्न शासनाच्या रमाई आवास योजनेमुळे पूर्ण झाले आहे. सध्या नव्याने बांधलेल्या घरकुलात श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे या दिव्यांग मुलासह सर्व कुटुंब आनंदाने राहत आहेत.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध शासकीय योजनांशी कृती संगम या उपक्रमाच्या माध्यमातून श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे यांना मनरेगा मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन मधून शौचालय, जल जीवन मधून नळाने पिण्याचे पाणी, सौभाग्य योजने मधून विज जोडणी, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन उपलब्ध करून देण्यात आले.

लाभार्थी श्री. पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे हे दिव्यांग असल्याने घरकुल बांधकामाची सर्व जबाबदारी त्यांच्या वडीलांवर असल्याने घरकुल बांधण्याकरीता पंचायत समिती, उत्तर सोलापूरचे गट विकास अधिकारी व त्यांचे सर्व कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी आवश्यक ते सर्व सहकार्य केले. तसेच ग्रामपंचायत तळे हिप्परगाचे ग्रामसेवक व त्यांचे सर्व कर्मचारी यांनीही याकामी मदत केली. एवढेच काय तर जिल्हास्तरावरुन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनीही या कामात त्यांचे मोलाचे योगदान दिले.

रमाई आवास योजनेमुळे माझा दिव्यांग मुलगा श्री.पांडूरंग गजेंद्र उडाणशिवे याला घरकुलाचा लाभ मिळाला त्यामुळे मी व माझा संपूर्ण परिवार खुप समाधानी व आनंदी असल्याचे त्यांच्या वडीलांनी सांगितले.





# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे कुडाच्या घराचे पक्क्या घरकुलात रूपांतर

**को**कण विभागातील सिंधुदुर्ग जिल्हा कुडाळ तालुक्यातील नारुर कर्याद नारुर ग्रामपंचायत आहे. गावात एस.टी. सेवा कार्यरत आहे. गावातील बहुतांश लोक मोल मजुरी व शेतीची कामे करतात. मात्र गावातील तरूणांचा कल हा लघुउद्योगांकडे असल्याने गावात मध्ये मोठया प्रमाणावर लघुद्योगही आहेत. अशा या नारुर कर्याद नारुर गावामध्ये श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे हे अतिशय मोडकळीस आलेल्या कच्च्या घरामध्ये राहत होते. सन २०१८ मध्ये पंचायत समिती कुडाळ अंतर्गत आवास प्लस 'ड' यादीचा ऑनलाईन सर्वे करण्यात आला. या 'ड' यादीमध्ये नारुर कर्याद नारुर या ग्रामपंचाय मध्ये श्री.लक्ष्मण राजाराम टिळवे यांच्या नावाचा समावेश केला.

सन २०२० मध्ये आवास प्लस 'ड' यादी ऑनलाईन मंजूर होऊन आली. नारुर ग्रामपंचायतच्या पात्र यादीमध्ये श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचे नाव पात्र होऊन आले. सन २०२१-२२ मध्ये 'ड' यादी अंतर्गत ग्रामपंचायतनिहाय उद्दिष्ट वाटप करण्यात आले. नारुर ग्रामपंचायतीला अ.जा. १ व इतर १ असे उद्दिष्ट वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत स्तरावरुन श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचे नाव ग्रामसभेत मंजूर करून तसा ठराव केला. ठरावामध्ये प्राधान्याने प्रथम क्रमांकावर श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचे नाव घेण्यात आले. पंचायत समितीस्तरावरुन ग्रामपंचायत कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रस्ताव सादर करणेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार ग्रामसेवक, सरपंच यांनी श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचेकडून घरकुल योजनेसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्राची पूर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयास सादर केला. पंचायत समिती कार्यालयाकडून प्रस्तावाची तपासणी करून त्वरीत पुढील कार्यवाहीसाठी जिल्हास्तरावर प्रस्ताव सादर केला. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांना घरकूल मंजूर करण्यात आले. ही बातमी कळताच श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

घरकुल मंजूरी नंतर पंचायत समिती कार्यालयाकडून श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांच्या बँक खाती पहिल्या हप्त्याची रक्कम जमा करण्यात आली. त्यानुसार त्यांनी घरकुलाचे बांधकाम सुरु केले. त्यांचे घरकुल बांधकाम प्रगतीत असतांना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, घरकुल योजना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी क्षेत्रीय भेटी देवून कामाची पहाणी केली. तसेच त्यांना घरकुल बांधकाम व निधी वितरणाबाबत योग्य ते सर्व मार्गदर्शन केले. पंचायत समितीस्तरावरून घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांना प्रधान्याने सर्व हप्ते वेळेत वितरीत केले. त्याचप्रमाणे त्यांच्या घरकुल बांधकामात गावातील महत्वाचे लोक प्रतिनिधी, सरपंच व ग्रामसेवक यांनी वेळोवेळी सहकार्य करून मोठे पाठबळ दिले. बघता बघता श्री.लक्ष्मण राजाराम टिळवे यांच्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले. स्वतःच्या हक्काच्या घरामध्ये श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांनी गृहप्रवेश केला असून त्यांना मिळालेल्या घरकुलाच्या स्वप्नपूर्ती बद्दलते पूर्णपणे समाधानी आहेत.

केद्र पुरस्कृत प्रधामंत्री आवास योजना – ग्रामीण मुळे सर्व सामान्य तळागाळातील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळत आहे. माझे घरकुल अत्यंत मोडकळीस आलेले होते. स्वखर्चाने घर बांधणे माझ्या आर्थिक परिस्थितीतीमुळे मला शक्य होत नव्हते. परंतु शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण मुळे मला माझे हक्काचे पक्के घर बांधणे शक्य झाले आहे. त्याबद्दल मी शासनाचा खरोखरच ऋणी आहे. तसेच शासकीय योजनांच्या कृती संगमातून मला घरकुलासह रोजगार, शौचालय, नळाने पाणी पुरवठा, विद्युत जोडणी, गॅस जोडणी व उपजिवीकेचे साधन, इ. लाभ मिळाले आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, तसेच तालुकास्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन तसेच बहुमुल्य मदत केल्याबद्दल मी सर्वांचे आभार व कृतज्ञता व्यक्त करीत श्री. लक्ष्मण राजाराम टिळवे यांनी सांगितले.





















# मिडीया कवरेज

ARASHTRA DGIPR
MahaDGIPR
#महाआवास अभियानांतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गतिमानतेने व गुणवत्तापूर्ण, दर्जेदार घरांची निर्मिती होणार असल्याचे ग्रामविकास मंत्री @girishdmahajan यांनी सांगितले. आतापर्यंत १३.१४ लाख घरकुले पूर्ण करण्यात आली असून ५.६१ लाख घरे प्रगतिपथावर असल्याचे त्यांनी सांगितले.

Translate Tweet



## गृहस्वप्नांना 'अमृत महाआवास'चे बळ

ग्रामीण गृहनिर्माण योजनांना गती देण्याच्या व त्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने 'अमृत महाआवास अभियान' हाती घेतले आहे...

## रमाई आवास योजनेत शिराळा तालुका प्रथम

पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव



जांभूळ घरकुल गृहप्रवेश व ८ अचा उतारा लाभार्थ्यांना देताना.

## रमाई आवास योजनेच्या घरकुलात गृहप्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

वडगाव मावळ : २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जांभूळ सांगवी ग्रामपंचायतीच्या वतीने रमाई आवास घरकुल योजनेचे नऊ घरे काम पूर्ण झाल्यामुळे गृहप्रवेश व ८ अ चा उतारा यांचे वाटप करण्यात आले.

पंतप्रधान घरकुल आवास योजना ९ घराचा पाया भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्यासाठी गटविकास अधिकारी सुधीर भागवत, कृषी अधिकारी संताजी जाधव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या विस्तार अधिकारी शुभांगी भूमकर, अधीक्षक, प्रीती पारसकर, जांभूळगावचे लोकनियुक्त आदर्श सरपंच नागेश ओव्हाळ, उपसरपंच एकनाथ गाडे, माजी सरपंच संतोष जांभूळकर, ग्रामपंचायत सदस्य अमित ओव्हाळ, कुंदा खांदवे, कल्पना काकरे, दीप्ती जांभूळकर, स्नेहल ओव्हाळ, रूपाली गायकवाड, रखमाबाई भोईर, ग्रामसेवक कल्याणी लोखंडे उपस्थित होते. लाभार्थ्यांना घर मिळाल्याबद्दल लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळण्यासाठी प्रयत्नशील

## ग्रामीण विकासाला प्राधान्य; शहराला मुबलक पाणी द्या

खासदार डॉ. महास्वामींजींची प्रशासनाला सूचना

## घरकुल पूर्ण करा, अन्यथा दुसऱ्या राज्यात जाईल

## उपसंचालक टकले यांची लोणी येथे भेट

## मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय अपूर्ण घरकुल लाभार्थ्यांची कार्यशाळा राबवी येथे संपन्न!

## घरकुलमध्ये झेडपीचा नंबर वाढला

मंजुरीत सातवा क्रमांक; सीईओ आव्हाडे यांच्या पाठपुराव्याचा परिणाम

## घरकुले पूर्णत्वात धुळे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

७,२५५ घरकुलांसह अहमदनगर प्रथम क्रमांकावर

## सर्वसामान्यांची साकारणार 'स्वप्नपूर्ती'

एक हजार घरकुलांचे गुरुवारी भूमिपूजन; ६०० घरकुलांचे लोकार्पण

## महाआवासमध्ये नगर राज्यात नंबर वन!

जिल्ह्यात ५१ दिवसांत तब्बल ४७५९ अपूर्ण घरे केली पूर्ण

## आवास योजनेंतर्गत घरकुलाचे लक्ष्यांक मार्चपर्यंत पूर्ण करा : रोहन घुगे

## बारा महिने होऊनही काम अपूर्णच; पहिल्या हप्त्याचे नऊ कोटी अडकले

## घरकुल लाभार्थींवर आता पोलिस कारवाई

## मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी : २०३१ घरकुलांचा लोकार्पण सोहळा १० रोजी

## जिल्ह्यातील सहा हजारांवर घरकुलांचे होणार भूमिपूजन

## जिल्ह्यात एकाच वेळी एक हजार घरकुलांचे भूमिपूजन

'सीईओ' खिलारींच्या हस्ते शबरी आदिवासी योजनेंतर्गत शुभारंभ

## 1813 मामलों में 38 लाख वसूले

## पिरकल्याण येथे घरकुल लाभार्थी मेळावा उत्साहात



जालना : जालना पंचायत समितीच्या वतीने पिरकल्याण येथे आयोजित प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल लाभार्थी मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. सदरील मेळाव्यात लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेऊन योग्य मार्गदर्शन करण्यात आले. सर्व लाभार्थ्यांना ३१ मार्च २०२३ पर्यंत घरकुल पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या व प्रत्यक्ष लाभार्थ्यांची घरकुल पाहणी करण्यात आली. यावेळी उपस्थित मा. सहायक गटविकास अधिकारी श्री. चव्हाण साहेब, कानडजे साहेब ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक ठाकरे मॅडम, सरपंच आजम भाई, उपसरपंच बाबासाहेब भुतेकर, सुरेश वाघमारे ग्रामपंचायत सदस्य, संजय शिंदे ग्रामपंचायत सदस्य, प्रमोद वाघमारे ग्रामपंचायत सदस्य, दत्ता शिंदे, कृष्णा शिंदे ग्रामपंचायत सदस्य, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता विठ्ठल इंदलकर व सर्व घरकूल लाभार्थी तथा गावकरी उपस्थीत होते.

## जिल्ह्यातलं एकही घरकुल परत जाणार नाही

गोरगरिबांच्या घरकुलांसाठी ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकांनी स्वत:ला मंजुरीच्या कामात झोकून दिले, राहिलेल्या १४७० घरकुलांना दोन दिवसात मंजुरी मिळणार

## सुटीच्या २ दिवसांत ४५ लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा

## रेतीसाठी लाभार्थी धडकले तुमसर तहसील कार्यालयात

## लाभार्थ्यांवर कारवाईची टांगती तलवार

## घरौंदे दिलाने में कोपरगांव पंचायत समिति आगे

## हिमायतनगर तालुक्यात ३११ घरकुलांचे भूमिपूजन

## कन्नड पंचायत समितीची सीईओंकडून झाडाझडती

## बांधकाम कामगारांच्या घरांसाठी १२ कोटी

सीईओ ज्ञानेश्वर खिलारी; 'अटल आवास योजने'तून पक्का निवारा

## अब दूसरी किश्त में 70 हजार रु मिलेंगे

लोकमत समाचार सेवा

## बारामतीत १६७ घरकुलांचा गृहप्रवेश

महाअमृत आवास अभियान : वृक्षारोपण उत्साहात

## लोहा तालुक्यातील १८५० गोरगरीब लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण

## घरकुल अनुदानाचे हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा

## घरकुल अनुदान वसुलीसाठी निर्णय; ११० लाभार्थ्यांकडून बांधकामाचा श्रीगणेशाच नाही

## प्रशासनाने निवडला लोकन्यायालयाचा मार्ग

२३ लाभार्थ्यांनी रक्कमही उचलली



ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत ग्रामीण गृहनिर्माण फोटो प्रदर्शनीची पहाणी करतांना मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत ग्राम विकास विभाग व विविध संस्थाशी भागीदारीची घोषणा करतांना मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी आभार प्रदर्शन करतांना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे




ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत पुणे येथील राज्यस्तरीय कार्यशाळे प्रसंगी उपस्थित मान्यवर व आमंत्रित अधिकारी

"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास"




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.com